## हृद्‌गत-

भगवान महावीर यांचा २५०० वा निर्वाण महोत्सव सर्व भारतात व भारताबाहेरही प्रमुख ठिकाणी नोंव्हेंबर १९७४ ते नोंव्हेबर १९७५ या दीपावली वर्षकालामध्ये अतिशय भव्य प्रमाणात व अभूतपूर्व उत्साहाच्या वातावरणात केंद्रीत शासन, प्रांतिक शासन, विविध सांस्कृतिक संस्था व सामान्य जनता यांच्याकडून मोठया श्रध्देने आणि आत्मीयतेने साजरा करण्यात आला. या निर्वाण मोहत्सवाला चिरस्थायी स्वरूप देण्याचे प्रयत्न अतिशय दूरदर्शीपणाने, संस्कारी निष्ठेने व मानवी हिताच्या निर्धाराने करण्यात आले. अनेक उपयुक्त व आनुषंगिक उपक्रम सुरू करण्यात आले. त्याप्रमाणे बरेच संकल्प सिध्दीस नेण्यास यश मिळाले आणि विविध योजना कार्यान्वित करण्यात आल्या. हया योजना सामन्यतः जनकल्याणकरी स्वरुपाच्या असून त्यामध्ये औषधालये, रुग्णालये, छात्रालये, अनाथलये, विद्यालये, जीवदया मंडळ, खेडयाचे उन्नयन कार्य, बालकाश्रम, महिलाश्रम, वृध्दाश्रम, कीर्तिस्तभ, पाठशाळा, प्रकाशन संस्था, ग्रथांलये इत्यादी विविध समाजसेवेच्या क्षेत्रातील संस्थांचा समावेश प्रामुख्याने होतो. सर्व लोकांचे-सर्व जीवमात्रांचे हित करणाऱ्या संस्था व योजना याबरोबरच जैन धर्म, साहित्य व संस्कृति यांच्या अभिवृध्दीला योग्य चालना देणाऱ्या व संस्कारी जीवनाचे महत्व जगाला समर्पक रीतीने पटवून देणाऱ्या विविध विधायक योजना जैन समाजाकडूनही आपपल्या परीने तत्परतेने व कार्यक्षम रीतीने प्रत्यक्षात उतरविण्यात आल्या.

तसेच धार्मिक दृष्टया पंथोपपंथामध्ये, प्रांताप्रांतामध्ये, निरनिराळया भाषा विभागल्या गेलेल्या व एकमेकापासून भौगोलिक दृष्टया शतकानुशतके दुरावलेल्या व भारताच्या कानाकोपऱ्यात पसरलेल्या जैन लोकामध्येही अधिक समंजसपणा निर्माण करुन सुदृष्ढ एकता प्रस्थापित करण्याच्या अत्यंत आवश्यक व महत्वपूर्ण कार्याकडेही खास लक्ष पुरविण्यात आले. ऐतिहासिक स्वरुपाच्या या ऐक्य निर्मितीच्या गुणाशील कार्यक्रमामध्ये सर्व धर्माच्या ज्येष्ठ नेत्यानी अतिशय जाणीवपूर्वक व जबाबदारीच्या भावनेने सहयोग दिला. युरोप, अमेरिका इत्यादी परकीय देशातही काही ठिकाणी फार चांगला प्रतिसाद मिळाला. ही घटना मानवी इतिहासात अत्यंत शुभसूचक व उल्लेखनीय होय. या सर्वांच्या सामूदायिक मंथनातून व अविरत प्रयत्नातून इतर धर्माशी अधिक समंजसपणा साधून सर्व जैनासाठी एक ध्वज, एक ध्वजगीत, एक बोधवाक्य, एक बोधचिन्ह, एक प्रार्थना इत्यादी एकता निदर्शक व ऐक्यपोषक अशा कित्येक बाबी नव्याने निर्धारीत करण्यात आल्या. एकढेच नव्हे तर त्या प्रत्यक्षात आचरण्यात आल्या. भ. महावीर निर्वाणाच्या २५०० व्या महोत्सवी वर्षात घडलेली ही सांस्कृतिक उपलब्धी अतिशय दूरपरिणामी व महत्वपूर्ण होय.

या ऐक्यप्रस्थापक प्रयत्नतील पुढची पायरी म्हणून जैनधर्माचे मौलिक तथ्य सामान्य जैनाना आणि इतर धर्मियानाही सम्यक् व पर्याप्त रीतीने जाणून घेता येईल असा एक सर्वसंग्राहक जैनग्रंथ सर्वमान्य होईल या रीतीने संकलित करण्यात यावा असा एक विचार माझ्या मनामध्ये दृढ होत गेला. त्या दृष्टीने विविध भाषा जाणणारे तत्वज्ञ व चिंतक असे समाजनेते यांच्या विचारधारांची आणि जैन साहित्यतील मूल स्त्रोतांची सुसंगती साधून मराठी भाषिकासाठी एक संकलनात्मक महाग्रंथ सिध्द करण्याचा प्रयत्न या पूर्णार्ध्याच्या रुपाने सफल होत आहे. मानवी संस्कृतिच्या व इतिहासाच्या दृष्टिकोनातून या नव्या महाग्रंथाला एक विशिष्ठ स्थान प्राप्त झाले आहे. कारण जैन धर्मासंबंधी मूलभूत अशा सर्व बाबींचा मराठी भाषेत असा दुसरा ग्रंथ आज उपलब्ध नाही, पूर्वीही नव्हता. असा हा जैन ज्ञानकोश जगापूढे सादर होत आहे.

विशेषतः मराठी मनाच्या भावुकतेची कदर करण्यासाठी, मराठी अस्मिता जागृत करण्यासाठी आणि मराठी साहित्याची सेवा उंचावण्यासाठी या विशाल ग्रंथाचा जन्म होत आहे. चारित्रापासून सिध्दान्तापर्यंत, तंत्रापासून मंत्रापर्यंत, तर्कापासून आत्मनुभुती पर्यंत, विषयवासनेपासून विषयविरक्ती पर्यंत, जीव घटनेपासून जीव-घटकद्रव्यपर्यंत विपूल व विविध स्वाध्याय-विषय येथे विश्वरुप-दर्शनाप्रमाणे उपलब्ध होत आहेत. एवढा सर्वस्पर्शी असूनही प्रामाण्य न गमावणारा ग्रंथ मराठीतच काय तर इतर कोणत्याही भाषेत आजवर अवतरला नाही. भ. महावीराच्या तीर्थातील ही एक महान उपलब्धी होय!

निखिल विश्वातील सर्व मांगल्याचा उदय **'जीवो मंगलम्'** याच एका सूत्रातून झाला आहे. या सुत्राचा मूळ शोध मात्र वीतरागी जिनांच्याच तीर्थप्रणालीत लागल्याचा आधार इतिहाससिध्द आहे. आचार मार्गातील **अहिंसारुप** महान सेतू जिनानी बांधला व जैनानी राखला आहे. यज्ञ-याग, न्याय-नीती, सदाचार, दानधर्म, संयम-तपस्या, व्रत विधान, देव-दैवत-परायणता, ध्यान-धारणा, आत्मदर्शन इत्यादी समग्र विस्तार याच मूलसूत्राचे भाष्य होय. सामान्य व निरागस प्रजेवर नव्हे तर आक्रमक हल्ला चढविण्याऱ्या विलासी,

विकारी, क्रूर भिल्ल, शक, हूण, बर्बर, तार्तर, मोंगल, अरब, पठाण, यवन, इ. शिकलेल्या आणि न शिकलेल्या पण पदार्थबुध्दी व भोगप्रधान लोकांच्या जिवनावरही याच जिनात्म मांगलयाचा प्रभाव पडलेला दिसून येतो. या दृष्टीने जैन-शासनाचा अभ्यास आजवर झालेला नाही. ज्ञानग्रंथ जीवनपर लोकोपयोगी ठरण्यासाठी अशा संतुलित अध्ययनाची नितांत गरज आहे. या मांगल्याची कास धरल्याशिवाय आपल्या मंगलमयता अवतरणार नाही. या **पूर्णार्ध्याच्या** रुपाने अशा वैश्विक अभ्यासाला विशाल क्षेत्र लाभवे ही मनीषा !

## सर्वस्पर्शित्वाची पार्श्वभूमी-

धर्माचा आणि गुणमयतेचा संबंध अविनाभावी आहे. सदाचार आणि गुणशीलता यांचा संबंध बीजांकूर न्यायाचा आहे. कोणत्याही वस्तूतील केवळ गुणधर्मच सनातन असतात. याच गुणमयतेवर अधिकार गाजविण्यासाठी प्रत्येक मानवसमूहामध्ये आपापला धर्म सनातन मानण्याची पध्दती रुढ झाली आहे. पण आज जे रुढ धर्ममार्ग आढळतात ते सर्व निरनिराळया लोकसमूहाने वाटून घेतलेले भागांश आहेत- पारंपारिक संपत्ती हिस्सेदार वाटून घेतात त्याप्रमाणे पुढे जाऊन त्यात आपपल्या वृत्ती-प्रवृतीप्रमाणे लोकानी स्वत:ची भर घातली आहे. पण ही कृत्रिम भर इतकी प्रत्ययकारी भासते की त्यातून मूल गुणमयता दृष्टीआड होते आणि मग भरीला पडलेले लोक आपापली भरच महत्वाची समजतात- श्रेष्ठ मानतात ( म्हणजेच दुसऱ्यांसंबधी तुच्छता व्यक्त करतात) आणि तोच मार्ग **सनातन** म्हणून कवटाळून बसतात.

खरी अधर्मभावना ती हीच. धर्म करायला जाऊन कर्म घडते ते असें ! हा तुच्छ भाव इतर सर्व अवगुणांचा जनक ठरतो. संस्कारबल नसलेल्या प्रांजळ गुणांची पिछेहाट होते. रागद्वेष-भोगलालसा या संततीची वृध्दी होते. संघर्ष वाढतो आणि हिंसेची पनिपत आपोआप तयार होते. गतीतून गती वाढत जाते. त्या आवेगालाच बिचारा मानव प्रगती मानून बसतो. गुणांकडून अवगुणाकडे गेले तरी त्या आवेगातील वळण ( Turning Point) लक्षातच येत नाही. अध्यवसाय वाढतो. त्यामुळे तो जीव पूर्व समजून खुशाल पश्चिमेकडे जात राहतो. दिशाबदलामुळे जीवनाची 'दशादश' होत राहते !

अशा प्रसंगी चिंतनशीलता-चेतनानुगामिता-स्वात्मोपलब्धी हाच एक गुणमयतेचा मार्ग उपयुक्त ठरतो. द्रव्यरुपी आत्मशील समणधर्म मात्र याच गुणमयतेचा खरा उपासक-साधक असतो. ही समणपरंपरा म्हणजेच खरा सनातन गुणमार्ग. भ. महावीर एक श्रेष्ठ समण होते. त्यांच्या तीर्थात निर्माण झालेल्या इतर समाणानी-मुनीनी तो सनातन मार्ग स्वत: सार्थपणे आचरुन दाखविला. पण त्यांचा तो अत्युच्च त्याग, आत्मबल नसलेल्या सामान्य उपासकाना पेलत नाही. कोटयावधी लोकातून एखादा समण वगळला तर उरलेल्या अब्जावधी उपासकासाठी संस्करभूमी कशी तयार करावयाची ही एक राष्ट्रीयच नव्हे तर वैश्विक समस्या आपल्यापुढे उभी ठाकली आहे. ती सोडविण्यासाठी आज खरा मानव आपपल्या परीने प्रत्यन्यशील झालेला दिसतो. पण त्या विभागी प्रयत्नाला अपेक्षित यश येत नाही. बोरे पेरुन पेरु कसे येणार ? आत्मधर्म राष्ट्रीय पातळीवर शिकविणे तर अशक्यच. यास्तव जीवाची भावास्था तरल करणे हा एक उपाय. भावशीलता सुधारण्यासाठी गुणधर्मशील स्वाघ्याय हा एकच मंगल मार्ग आहे. भ. महावीर-तीर्थातील भावश्रुत सागराप्रमाणे, जीवनमय असेल तरी प्रसंगवशात् त्यात खारटपणा साचला आहे. तो काढण्याची प्रक्रिया मोठया प्रमाणात वाढविण्याची निंतात गरज आहे. या प्रक्रियेतील मध्यवर्ती वस्तू म्हणजे भ. महावीरप्रणीत सर्वोदय तीर्थातील ग्रंथसंपत्ति ! ही संस्कारक्षम साहित्य-परंपरा वाढविण्याचे विविध प्रयत्न होत आहेत. अर्ध्यरुप धारण करुनही पूर्णमयतेकडें कल असलेला हा **पूर्णार्ध्य** म्हणजेच आणखी एक पुढचे पाऊल ! !

जिनपरंपरेतील वीतरागी तत्वाना व कर्मसिध्दान्ताला कोणत्याही जैनांचा कधीही विरोध नव्हता. ही तात्विक बाब लक्षणीय होय. ६ द्रव्ये, ७ तत्वे, ९ पदार्थ, आत्मलक्षण, ध्यानस्वरुप, केवलज्ञान, मोक्षावस्था, १४ गुणस्थान, १४ मार्गणा, १४ जीवसमास, रत्नत्रय, कषाय-लेश्या इत्यादी मूळ तत्वांच्या विधानामध्ये कोणत्याही पंथाचा कोणत्याही प्रकारे विसंवाद नव्हता व नाही. त्यामुळे जैंनाच्या पंथोपंथातील अभिनिवेश टाळून सर्व जैनाना आणि इतरेजनानही पेलेल असा समान ग्रंथ निर्माण करण्यास आवश्यक व पोषक अशी पार्श्वभूमी आपत: तयार होती. पण प्रत्यक्षात महान् प्रयत्न सिध्द करुन सर्वमान्य अशा ज्ञानकोशात्मक ग्रंथाची रचना आजपर्यंत झाली नाही. कालमानाने आज अशी गरज तीव्रपणे भासत राहिली. धर्माच्या नि:पक्षपाती आभ्यासाला आणि मानवी जीवनाच्या उन्नयनाला अनुरप असे एक विशिष्ट युग आज अवतरले आहे. २५०० व्या निर्वाण महोत्सवाच्या निमित्ताने सर्वोदयी भावना सर्व लोकांच्या मनावर बिंबविण्यासाठी वीतरागी साहित्याचा अभ्यास सर्वकषपणे एकाच संग्रहामध्ये उपलब्ध करुन देता यावा म्हणून समंजस विद्वानाना

पाचारण करण्यात आले. त्याप्रमाणे विविध प्रयत्न सुरु झाले, अशा समग्र सहकार्यातूनच **पूर्णार्ध्य** या सर्वोपयोगी संग्रहाचे प्रकाशन होत आहे. पंथोपपंथीय बाहयचार सोडला तर केवलीप्रणीत जिनागमामध्ये मूळ तत्वांचा सुसंवाद पूर्वीपासूनच शाबूत राहिलेला आढळतो. मतभेदाचे बाहयक्षेत्र टाळूनच या संग्रहाची संपन्नता साधली आहे. संग्रहात्मक स्वरुपाचे छोटे-मोठे ग्रंथ यापूर्वीही प्रकाशीत झालेले आहेत आणि आजही इतरत्र होत आहेत. फरक एवढाच की त्यांचा स्तर वैयक्तिक असून त्यातील विषयांची मर्यादा सर्वग्राहक बुध्दीसाटी त्रोटक ठरते. त्यामुळेच त्यांच्या मान्यतेचे, प्रचाराचे व प्रभावनेचे क्षेत्रही मर्यादितच राहिले आहे. पूर्णार्ध्याच्या प्रकाशनाचा स्तर मात्र सर्वमान्य विद्वत्परिषदेच्या पायरीपर्यंत उंचावला गेला आहे. त्यामुळे याची प्रभावना सार्वत्रिक व सार्वकालिक ठरण्यास प्रत्यवाय नसावा. जैनधर्माचाही सर्वंकष व सर्वमान्य असा एक ज्ञानकोश-स्वरुपाचा ग्रंथ सर्वांच्या अभ्यासाला उपलब्ध व्हावा ही फार दिवसाची अपूरी इच्छा या पूर्णार्ध्याच्या रुपाने पूर्ण होत आहे. या ग्रंथाची ही विशाल कल्पना अनेक जैन विद्वानानी उचलून धरली आणि तिचे मानवी महत्व ओळखून महराष्ट्र शासनाने या ग्रंथाचे महान गौरव केला आहे.

अशा प्रमाणभूत, सुविशाल व सर्वस्पर्शी सेकलनाची निर्मिती होण्याचा योग सद्य:कालीन युगामध्ये भ. महावीरनंतर २५०० वर्षानी आला. या ग्रंथाची संकलनही एक जैन श्रुतस्कंध विभागातील ऐतिहासिक स्वरुपाची व स्वाध्याय क्षेत्रातील उपयुक्त घटना होय. ही घटना १९७४ मध्ये घडण्यास अनेक गोष्टी कारणीभून ठरल्या. २५०० व्या वीरनिर्वाण महोत्सवाच्या निमित्तने सर्वपंथीयच नव्हे तर सर्वधर्मीय समंजसपणा मोठया प्रमाणात निर्माण झाला. जैनांच्या दृष्टीने या महोत्सवाला अनन्यसाधारण महत्व प्राप्त झाले. भ. महावीरांचे सर्व अनुयायी, शासनसंस्था आणि इतरेजनही अपूर्व उत्साहाच्या वातावरणात हे वर्ष एकत्रितपणे साजरे करण्यास उद्युक्त झाले. साहजिकच सर्वपंथीय जैनामध्येही समन्वयाची व एकात्मतेची भूमिका प्रबळ झाली. त्यामुळे ज्ञानकोशस्वरुपी, प्रमाणभूत व सर्व लोकोपयोगी ग्रंथ निर्माण करण्याच्या आवाहनाला विचारवंतानी, पंडितानी, लेखकानी व तरुण पिढीनेही उत्तम प्रतिसाद दिला. त्यामुळेच या योजनेचा पाठपुरावा निर्धारपूर्वक व सातत्याने करता आला. या ग्रंथाच्या निर्मितीच्या रुपाने सर्वांचे सहकार्य लाभले आहे. यात सहयोग देणारे व घेणारे एकाकार झाले आहेत. त्यामुळे आभार मानणे ही भावनाच विलीन झाली आहे. प्रमुख व प्रतिष्ठित विद्वानानी या कार्याची वैचारीक व संपादनक्रियेची बाजू आत्मीयतेने संभाळली. प्रमुख संस्था, मान्यवर नेते व उस्ताही कार्यकर्ते यानी संपूर्ण सहयोग दिला आणि या पूर्णार्ध्याच्या निमित्तने १९७८ साली जैन संस्कृतीच्या दालनात आणि भारतीय विद्येच्या महाराष्ट्र सारस्वतात एक पाऊल पुढे पडले आहे !

सर्व लोकानाही उपयुक्त ठरणारा असा एकसंधी व प्रमाणभूत ग्रंथ आजवर उपलब्ध नव्हता. पंथीय लेखनपध्दतीच्या रुढीमुळे जैनामध्ये तात्विक बाबतीतही फारशी समानता नाही असा इतर लोकांचा ग्रह निर्माण होण्यस वाव मिळत होता. शिवाय जैन ग्रंथामध्ये केवळ सर्वज्ञप्रणीत रुढ तत्वांचा आणि आम्नायगत आचारपध्दतींचा विमर्श अंतर्भूत होत असल्यामुळे त्यांचा आपल्या जीवनामध्ये कोणता व कितपत संबंध आहे याचा बोध होणे सामान्य लोकाना जड जात असल्याने धर्म व धर्मग्रंथ त्याना त्यांच्या जीवनापेक्षा निराळेच असल्याचा भास होत राहिला. त्यामुळे धार्मिक क्षेत्रात आणि सामाजिक जीवनातही एक प्रकारचे मानसिक दूरत्व आणि औदासिन्य वाढत चालले होते. हा दुरावा निर्माण करणाऱ्या परिस्थितीला पायबंध घालून सर्व लोकामध्ये **‘ जीवो मंगलम् ’** स्वरुपाची कल्याणभावना जोपसण्याची गरज फारच तीव्र भासत होती. या ग्रंथाच्या माध्यमाने त्या मंगलभावनेची पूर्ती होण्यास एक सुवर्ण संधी अवतरली आहे. द्रव्यात्मक दृष्टीचा आणि आत्मप्रत्ययाचा परिचय करुन देणार एक सर्वव्यापी असा विशाल ग्रंथ उपलब्ध झाला आहे. म्हणूनच ही उपलब्धी वर्तमान कालातील एक महनीय कामगिरी आणि मानवी इतिहासातील एक ठळक घटना ठरली आहे.

भ. महावीर जगातील एक अद्वितीय, असामान्य, अलौकिक थोर मानवतावादी महामानव होऊन गेले. त्यांनी अनेक अमूल्य, चिरंतन टिकणारी, आत्मकल्याणकारी, विष्वबंधूत्वाची, अहिंसा, सत्य, अपरिग्रह, ब्रहयचर्य, महामानवता इ. महान दिव्य तत्वे प्रतिपादिली व प्रत्यक्ष आचरणात आणली. त्यांच्या दिव्य उपदेशामृताने प्रेरित होऊन, माझ्या अंत:करणात स्फुर्ति जागृत झाली. अशा त्या थोर जगत्श्रेष्ठ महामानवाच्या तत्वाच्या अभ्यासाने जागृत होऊन त्यांच्या भक्तीने प्रेरित होऊन वंदन पूजा करण्यासाठी व त्यांच्या दिव्य तत्वांचा प्रकाश जगात अधिकात अधिक तेजस्वी करण्याचा मी प्रयत्न केलेला आहे. भ. महावीरांची भक्ती पूजा प्रत्येक अर्ध्यातून श्रध्दापूर्वक शुध्द भावाने केलेली आहे. भ. महावीर तीर्थंकराच्या

पदकमली नतमस्तक होऊन अर्ध्य समर्पण करीत आहे. त्यांच्या चरणी भक्ती, श्रध्दा, धर्मभावना समर्पण केलेल्या आहेत म्हणून अर्ध्य हे नामाभिधान दिले आहे. मला त्यांच्या दिव्य तत्वज्ञानाची ओळख होऊन आत्मजागृती झाली व खरी मानवतेची कल्याण करणारी भ. महावीरानी सांगितलेली तत्वेच एकमेव अशी आहेत याची सत्यता पटली, त्यापासून स्फूर्ति मिळाली व आत्मानुभूतीचा आनंद मिळाला. याचा जगाला उपयोग व्हावा व सर्व जीवांचे कल्याण व्हावे याच एका मंगलभावनेने प्रेरित होऊन हा उपक्रम केला आहे. मला झालेल्या आत्मजागृतीतून कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी 'अर्ध्य' देण्याचा प्रयत्न माझी अल्पमती असताना, शक्ती नसताना देखील केलेला आहे. भ. महावीरांच्या मंगल अशिर्वादच यास प्रेरणादायी झालेला आहे. त्यातही पूर्णार्ध्य नाव देण्याचे विशेष म्हणजे पूर्णत्वास पोहोचलेल्या वीतरागी, सर्वज्ञ प्रभूस मंगलभावनामय होऊन, भक्तीत तल्लीन होऊन, संपूर्ण श्रध्दा, भक्ती, भावना चरणी समर्पित केलेल्या आहेत. सर्वांगपरिपूर्ण असे भ. माहवीर म्हणूनच या ग्रंथास 'पूर्णार्ध्य' हे नाव दिलेले आहे. याप्रमाणे या ग्रंथात अकरा अर्ध्य सविस्तरपणे वर्णन केले आहेत.

**अर्ध्य १ ला : भ. महावीरांच्या मंगल पूजेची स्थापना -**

आपल्या शुभकरामध्ये मंगल, पवित्र महाग्रंथ देण्यापूर्वी आम्ही भ. महावीरांच्या मंगल पूजेची स्थापना करुन सुरुवात केली आहे. अर्थात् पंच णमोकार महामंत्राची स्थापना म्हणजे पंचपरमेष्ठीचीं स्थापना होय. या पहिल्या अर्ध्यांचे ध्येयच मुळी पूर्णतवास पोहोंचणे आहे. यामध्ये पंच णमोकार महामंत्राचे माहात्म्य, प्रभाव वर्णिला आहे. पंचपरमेष्ठी सर्वश्रेष्ठ आहेत. या महामंत्राच्या प्रभावामुळच जगातील सर्व साधू की जे वीतरागी, सर्वज्ञ पूर्णत्वास पोहोचले; जे अरिहंत, सिध्द, अचार्य व उपाध्याय व साधू वीतरागी सर्वज्ञ आहेत त्यांना वंदन कलेले आहे. यामध्ये कोणत्याही एका व्यक्तीला, धर्माला, पंथाला वंदन केलेले नाही तर जे कोणी अर्हत् सिध्द पदावर विराजमान झाले, ज्यानी वीतराग भावनेने आचार्य, उपाध्याय साधू परंपरेतून आपल्या बांधवाना धर्मोपदेश देऊन पूर्णत्व प्राप्त करुन घेतले त्या सर्वांना वंदन केले आहे. पंचपरमेष्ठीच वीतरागी सर्वज्ञ, मंगल, उत्तम, लोकोत्मम शरणयोग्य आहेत. मंत्रमाहात्म्य अनादि, अनंत, अवर्णनीय असा आहे. या मंत्रसामार्थ्यानेच जीव पूर्णत्वास पोहोचतो. प्रत्येक कालात महापुरुषानी, लोकोत्तर तीर्थंकरानी महामंत्राचे माहात्म्य, खऱ्या धर्माची तत्वे सांगितली, कल्याणकारी मंत्रांचा उपदेश केला. या अर्ध्यात णमोकारमंत्राचे माहात्म्य, सामर्थ्य, विधी, उद्देश वर्णिलेला आहे. हा मंत्रच धर्माचे संस्कृतीचें मूळ आहे.

**जैनध्वज** - जैनध्वज हा आपल्या धर्माचे महान मंगल प्रतिक आहे. जिनधर्म हा नैसर्गिक आहे. जैनध्वज आरोग्य, संपत्ति,राजवृध्दी, राज्यात यश, कीर्ती व प्रताप, शेतकरी, बालक, गोरक्षक, स्त्री इ. ची समृध्दी व शासनासाठी धान्य, ऐश्वर्य, शांती, समाधान, आनंद, समता, बंधुत्व,प्रेम प्रदान करणारा आहे. हा ध्वज केशरी रंगाचा असून मध्यभागी स्वस्तिक चिन्ह असते. स्वस्तिक चिन्ह हे जैन धर्माचे 'आदिचिन्ह' आहे. जैनध्वज हा शुभ, मंगल चिन्ह सूचित करतो. असा ध्वज जिनमंदिरात, शिखरावर, समवसरणात, धर्मचक्राच्या विहाराच्या वेळी अग्रेसर उंच असतो. तो जणू अहिंसा, समता, शांतता व विश्वबंधुत्वाची जाणीव करुन देत असतो. भ. महावीर २५०० व्या निर्वाणमहोत्सवाच्यावेळी पंचरंगी ध्वज सर्वमान्य करण्यात आला. असा अलौकिक, महान, पवित्र, मंगलमय जैन ध्वज वर्णिला आहे.

**संस्कृती** - संस्कृतीवरुन देशाची, माणसाची, धर्माची श्रेष्ठता ठरत असते. जैनधर्म हा अनादि अनंत असून जैन संस्कृति हे त्याचे मूळ आहे. संस्कती ही देखील अनादि, अनंत, श्रेष्ट आहे. जैनसंस्कृति अहिंसा, सत्य स्याद्वाद, ब्रहयचार्य, समता, विश्वबंधुत्व इ. महान तत्वावर अधिष्टित आहे. जैनसंस्कृति प्राचीन व लोकशक्तीची जननी आहे. सर्व संसकृतीची जैनसंस्कृति ही आदर्श जननी आहे. त्यामुळेच तर जगात भारतीय संस्कृति थोर उज्ज्वल आणि सर्वश्रेष्ठ ठरलेली आहे. जैन संस्कृतीचे जगातील अत्युत्तम व सर्वश्रेष्ठ अशी अनुकरणीय संस्कृती आहे.

जैनधर्म हा आंतरराष्ट्रीय महान धर्म आहे. जैनधर्माची तत्वे थोर, उदात्त, कल्याणकारी, जन्मार्गदर्शक, पूर्णत्वास प्राप्त करुन देणारी अशी आहेत. अहिंसा, सत्य, अपरिग्रह, ब्रहयचर्य, समता, शांती, विश्वबंधुत्व ही महान अमोलिक, अद्वितीय तत्वे असल्यामुळे त्यास आंतरराष्ट्रीय स्वरुप प्राप्त झालेले आहे. तत्वे राष्ट्रहितकारी आहेत.

**अर्ध्य २ रा: भ. महावीर जीवन गाथा -**

या अर्ध्यात अहिंसेचे थोर सर्वश्रेष्ठ प्रणेते तीर्थकार भ. महावीर यांच्या जीवनविषयी वर्णन केले आहे. त्यांच्या गर्भकलयाणिकापासून ते मोक्षकल्याणिकपर्यंतचे यथार्थ वर्णन केलेले आहे. भ. महावीर पूर्व भारतीय समाज रक्तरंजित, करुणामय, आत्यंतिक वैभव व पराकोटीचं दारिद्रय या विषमतेने भरलेला होता. राजे, महाराजे, दरबरी लोक, पंडित वर्ग यांचा सुर्वणकाल व सामान्य जनता व शूद्रादि यांचा मरणकाल होता. धनवंत लोक सुख विलासात दंग तर प्रजा दुःखाच्या खोल दरीत लोटलेली, पिचत पडलेली होती. अशा समयी भयाण विषमता नष्ट करुन समता प्रस्थापित करण्यासाठीच की काय भ. माहवीर जन्मले. त्यांचा जन्मसोहळा अपूर्व व अलौकिक होता. या थोर दिव्य महात्म्याचया दर्शनाला मानवच काय परंतू स्वर्गात सुखसागरात, ऐश्वर्यात लोटांगण घेणारे इंद्र-इंद्रयणी देव खाली पृथ्वीवर अवतारले. त्यानी वीर महात्म्यापुढे नतमस्तक होवून स्तुती पूजा केली. ते नावाप्रमाणे महान वीरच होते. त्यांच्यात उपजतच ज्ञानाचा अगाध विस्तीर्ण सागर होता. मुळातच ते वीतरागी, वैराग्य भावनेने युक्त होते. त्यांची आपोआपच वैराग्याकडे ओढ लागली. त्यांना कधीच तहान, भूक, निद्रा नव्हते. कारण त्यांच्यात अलौकिकिता, वीतरागता, मंगलभाव, शुध्दभाव होते. अशा त्या सर्वज्ञ, वीतरागी भ. माहवीर प्रभूंच्यासमोर सर्वांचा गर्वहरण होत असे. त्यावेळी पृथ्वीतलावर अनंदीआनंद, समता पसरली होती. झाडे फळा-फुलानी बहरून गेलेली होती. जगाला भ. महावीरनी महान् अहिंसामय, विश्ववंद्य जैनधर्माच्या महान तत्वाची ओळख करुन दिली व आचरण करायला शिकविले. त्यांनी सर्व कर्माचा नाश करुन पूर्णत्व प्राप्त करुन घेतले. त्यावेळी त्रैलोक्यातील जीवना अप्रतिम आनंद व सुख झाले. अशा त्या थोर जगश्रेष्ठ विश्ववंद्य भ. महावीरांच्या मोक्षकल्याणिक सोहळयास मानवच नाही तर स्वर्गातील देवसुध्दां खाली पृथ्वीवर आले. स्तुती पूजा करून जैनधर्माची महत्ता वाढविली. अशा त्या दिव्य, वीतरागी, सर्वज्ञ चिदानंदस्वरुपी महावीरास शतशः विनम्र वंदन.

**अर्ध्य ३ रा: इतिहास -**

इति+आ+हास म्हणजे जसे घडते तसे वर्णन करणे. जैनधर्माचा इतिहास हा अतिप्राचीन अनादि अनंत आहे. या अर्ध्यात जैनधर्म इतिहासाची प्राचीनता सोदाहरण स्पष्टपणे, प्राचीनता सोदाहरण स्पष्टपणे, प्रामाणिकपणे वर्णिली आहे. कालाचे वर्णन करुन प्रत्येक कालातील इतिहास वर्णिलेला आहे. जैनधर्माचा इतिहास म्हणजे नुसते वर्णन नाही तर तो हजारो वर्षे विश्वाला प्रेरणा, स्फूर्ति, आदर्श मुल्ये, कल्याणकारी मार्ग व मानवाच्या सर्वांगीण उन्नतीचे मार्गदर्शन करणारा असा आहे. स्त्रीशिक्षणाची प्रथम सुरुवात भ. ऋषभदेवानी आपल्या कन्या ब्राम्ही व सुंदरीस शिक्षण देऊन केली. त्यागात, अध्यात्मात जैनधर्म सर्वश्रेष्ठ आहे हें इतिहासानेच सिध्द झाले आहे. चक्रवर्ती भरत राजाच्या नावावरूनच आपल्या देशाला भारत हे नाव पडले. त्यावरुनच जैन इतिहास किती महान अलौकिक, अद्वितीय आहे याची कल्पना येते. ज्याप्रमाणे जैनधर्म त्यागात, अध्यात्मात अग्रेसर आहे त्याचप्रमाणे रणांगणात, गृहस्थधर्म पालनात व राजकारणातही सर्वश्रेष्ठ असल्याचे इतिहसानेच दाखवून दिलेले आहे. भ.ऋषभनाथापासून भ.महावीरापर्यंत, द. भारतात जैनधर्म अत्युच्च शिखरावर पोहोचला. कन्नड साहित्याला तर जैन साहित्याचे महान वरदानच लाभलेले आहे. संपूर्ण भारतात जैनधर्म अत्युच्च शिखरावर पोहोचला. कन्नड साहित्याला तर जैन साहित्याचे महान वरदानच लाभलेले आहे. संपूर्ण भारतात भ. महावीरांनी विहार करुन जैनतत्वाचा प्रसार केला. थोर अमोलिक तत्वामु ळेच जैनधर्म विश्वधर्म झालेला आपण प्रत्यक्ष पाहतच आहोत. जैनधर्म हा प्राचीन, मध्ययुगीन व आधुनिक काळात सर्वश्रेष्ठ ठरलेला आहे. जैनधर्माचा इतिहास अनादि, अनंत, सर्वश्रेष्ठ आहे. जैन इतिहासाला महान, अद्वितीय परंपरा आहे.

जैन इतिहासात महान वीर युगपुरुष, भ. ऋषभनाथापासून अध्यात्मयोगी भ. महावीरापर्यंत चोवीस तीर्थकर होऊन गेले. त्यांचा सुवर्ण इतिहास जगाला अहिंसा, सत्य, अपरिग्रह समता, विश्वबंधुत्व व मानवता धर्माची शिकवण ज्वलंतपणे देत आहे. २५०० वर्षापूर्वी किंबहूना भ. ऋषभनाथानी अहिंसा, अपरिग्रह, ब्रम्हचर्य, समता, विश्वबंधुत्व, मानवता, सर्व जीव समान आहेत ही तत्वे सांगितली. त्यांची प्रचीति, अनुभूति, महती आजच्या वैज्ञानिक युगात मानवाला प्रकर्षाने जाणवू लागली. आजचे जगाला भेडसावणारे वर्गकलह, सत्तपिपासा, हिंसाचार, अवाढव्य, लोकसंख्या, उपासमार, अशांतता, युध्द इ. अनेक जटिल प्रश्न जैनधर्माची महान अमोलिक तत्वे आचरल्याने आपोआपच नाहिसे होतील, हे प्राचीन जैन इतिहासावरुन स्पष्ट होते. आजच्या नवयुवकांनी, राज्यकर्त्यानी जैन इतिहासा पडताळून पाहून जर त्या तत्वाचा स्वीकार केला आणि

त्याप्रमाणे आचरण केले तर जगात ती अशांतता आहे, ती अवश्य टळेल यात तिळमात्र शंका नाही. इतका जैन इतिहास प्रबळ, प्रभावी व ज्वलंत आहे.

जैन इतिहासाने अनेक महान युगपुरुषांची महति वर्णिलेली आहे. त्यामध्ये प्रामुख्याने चक्रवर्ती भरत, बाहूबली, श्रेणिक, अजातशत्रू, उदयन, महापद्मानंद, धनानंद, चंद्रगुप्त मौर्य, चामुंडराय, बिंदुसार, सम्राट अशोक, सम्राट संप्रती, राजा खारवेल, जितशत्रु, समुद्रगुप्त, रामगुप्त, कुमारगुप्त, स्कंदगुप्त, हर्ष, गुर्जर प्रतिहार हे होत. विजयनगरच्या सम्राज्याला जैनांचे वरदानच मिळालेले होते. श्रवणबेळगोळची जगप्रसिध्द गोमटेश्वराची विशालकाय दिव्य मूर्ती राजा चामुंडरायाच्या जैनधर्म प्रीतीचे मूर्तिमंत प्रतिक असून अखिल विश्वाला ललामभूत ठरलेले आहे. यावरुन जैन फक्त त्यागात व अहिंसेतच अग्रेसर नसून राजकारणातही अग्रेसर होते हे सिध्द होते. अशा या महान जगद्विख्यात जैन इतिहासापासून आधूनिक राज्यकर्त्यांनी, समाजसेवकानी, तरुणानी व नागरिकांनी प्रेरणा घेऊन, आपला देश, विश्व सुफलाम् सुजलाम्, शांततामय करण्यासाठी अवश्यमेव प्रयत्न केला पाहिजे, भावी इतिहास उज्ज्वल घडविला पाहिजे. जैन इतिहासापासून स्फुर्ति, घेऊन समाजाला, जगाला आदर्श दाखवून मानवताधर्म विकसिकत करुन सर्वार्थसिध्दी प्रापत करुन घेण्याचा मार्ग दाखवावा. जैन इतिहास हा अगाध अथांग, सागरापेक्षाही विस्तृत, अमर्यादित-दिव्य, तेजस्वी असा आहे.

**अर्ध्य ४ था : जैन आचार्य -**

जैन साहित्याला जीवदान देण्याचे महान कार्य आचार्य परंपरेने केलेले आहे. 'आचार्यदेवो भव ' यावरुन आचार्य देवासमान असल्याचेच सिध्द होते. म्हणूनच त्यांना विनम्र वंदन केलेले आहे. जैन आचार्य एका ठिकाणी न राहता वाहात्या पाण्याप्रमाणे सतत एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी विहार करीत व स्वत: रत्नत्रय संपन्न असल्यामुळे लोकाना हितोपदेश करण्याचे महान कार्य करीत. जैन अचार्यनीच जैनसाहित्याची निर्मिती व वृध्दी केली. जैनधर्माचे सर्व साहित्य जतन करण्याचे सर्व श्रेय आचार्यानाच आहे. हे प्रसिध्दिपराङ:मुख असतात. आचार्य छत्तीस गुणानी युक्त असतात. भगवंताच्या दिव्यध्वनीतून निघालेली दिक्कालातीत असणारी, विज्ञानाच्या कसाला १००% उतरणारी व आजच्या विज्ञानास मार्गदर्शक महान तत्वे, सामान्य जनाना दिव्यध्वनी बंद झाल्यावर पोहोचविण्याचे कार्य थोर आचार्यानी साहित्यनिर्मिती करुन केलेले आहे. आचार्य धर्माची व तिर्थकारांची थोर परंपरा टिकविण्याचे व सामान्य जनानां सागण्याचे महत्वाचे कार्य करीत आहेत. आ.पुष्पदंत व भुतबली, विरसेन, कुंदकुंद, उमास्वमी, सम्मतभद्र, पुज्यपाद, अमूर्तचंद्रसुरी, जिनसेन, उमास्वामी, येतीवृषभाचार्य, नेमीचंद्राचार्य भट्टाकलंक, सिध्दसेन, दिवाकर, विदयानंद, हिमचंद्र, कार्तिकेय, रेविषेण, सम्मतभद्र इ. आपल्या अजरामर किर्तीने अमर झाले. या पेक्षाही अनेक महान आचार्य होऊन गेले आहेत. त्याचीं नावे या ठिकाणी देऊ शकले नाही. परंतू सर्वपथीय आचार्याची नावावली 'जैन आचार्य' या अर्ध्याच्या शेवटी दिलेली आहे. आचार्य परंपरा महान व प्राचीन आहे. सर्व भाषात साहित्यनिर्मिति व धर्मोपदेश या थोर आचार्यानी केला. ते अतिविद्वान, अलौकिक, प्रभावशाली वीतरागी, निर्लोभी, निरागस, सत्यवादी, अहिंसेचे पुजारी होते. त्यांनी सर्व क्षेत्रात आपली महान विद्वता दाखविली.

इतिहासानेच जैनचार्य वादविवादात अजिंक्य असल्याचे सिध्द करुन दाखविले आहे. त्यांची बुध्दिमत्त इतकी प्रगल्भ, प्रभावी, अत्युत्तम होती की कोणीही त्यांच्या समोर वादविवादात, उष्णतेसमोर जसा बर्फ़ वितळतो त्याप्रमाणे पराजित होत असे. कारण आचार्य हेच मुळात सत्य, अहिंसा, समता, मानवता धर्माचे पुजारी होते. ते विश्ववंद्य जगन्मान्य धर्माचे उपासक होते.

आजच्या आधुनिक वैज्ञानिक युगात मानव प्रगतीच्या अत्युच्च शिखरावर पोहोचला असतानादेखील पाश्चात्य राष्ट्रातील लोकांना शांती मिळेना. ते बेचैन आहेत. श्रीमंतीत लोळण घेत असतांनादेखील शांति नाही. जैन साधू हेच खरेखुरे शांतीचे उपासक आहेत. शांतीचा मार्ग दाखविणारे आहेत. खरी शांती ही दिगंबर साधूजवळच आहे, याची प्रचीति पाश्चात्य श्रीमंत राष्ट्रातील लोकांना आलेली आहे. म्हणूनच त्यांना जैन आचार्य, साधूबद्दल अतोनात कुतूहल आहे, आकर्षण आहे. आधुनिक विज्ञानदेखील शांती मिळविण्याच्या बाबतीत अपयशी ठरले आहे. जैन दिगंबर आचार्य साधू हेच एकमेव शांतिदूत असल्याचे आधुनिक वैज्ञानिक युगात सिध्द झाले आहे. यावरुन आपणाला थोर आचार्यपरंपरेची महती सहजच लक्षात येईल. या थोर आचार्यपरंपरेचे सविस्तर वर्णन करण्याचा सदर अर्ध्यात प्रयत्न केला आहे. आचार्याचा आदर्श सामान्य लोकांसमोर ठेवून त्याप्रमाणे आचरण करुन स्वकल्याण, राष्ट्रकल्याण करणें आपलें कर्तव्य आहे.

**अर्घ्य ५ वा : जैन साहित्य-**

जैन साहित्य प्रथमानुयोग, द्रव्यानुयोग, करणानुयोग यामध्ये विस्तृत व विपूल भरलेले आहे. जैन साहित्य हे सर्व साहित्याचे मूळ, जननी आहे. जैन साहित्य अतिप्राचीन व मौलिक आहे. आम्ही ज्यावेळी संशोधन करण्यासाठी बसलो त्यावेळी इतर प्रत्येक साहित्याची मग ते कोणत्याही भाषेत असो त्याची सुरुवात जैन साहित्यानेच झाली. जैन साहित्य अमाप व विशाल समुद्राएवढे आहे. जैन साहित्यच सर्व साहित्याचे उगमस्थान, जननी आहे. जैन साहित्य सर्व भाषांत आहे. मराठी, हिंदी, कन्नड, तेलमू, तामीळ, गुजराथी, संस्कृत, अर्धमागधी, प्राकृत, इंग्रजी इ. विविध भाषात विपूल प्रमाणात आहे. जैन साहित्याचा अभ्यास करुनच देशात व परदेशात नवनवीन वैज्ञानिक प्रयोग व अध्यात्मप्रयोग करुन मानवाने आपले प्रगतीचे यशोमंदिर गाठण्याचा अपूर्व पराक्रम केला आहे व करीत आहे. त्याचे मूळ उगमस्थान जैन साहित्य आहे. जैन साहित्या अगाध, अपूर्व, अमोलिक, अलौकिक, दिव्य, मानवकल्याणकारी असल्यामुळेच परदेशातून त्यास प्रचंड मागणी येत आहे. तरी आजच्या विद्वानानी जैन साहित्याची निर्मिती जास्तीतजास्त इंग्रजी भाषेत करुन जगाच्या कल्याणसाठी त्याचा सदुपयोग करण्याचा महान कार्याला हाती घेऊन यशस्वी करुन दाखविण्याची निंतात गरज आहे. आजचें नवशिक्षित तरुण ही अपेक्षा पूर्ण करतील असा विश्वास वाटतो.

**पुराण साहित्य-** जैन साहित्यांत संस्कृत, प्राकृत पुराण साहित्य सर्वश्रेष्ठ आहे. पुराण साहित्य प्रथमानुयोगात विविध भाषात आहेत. जैनकथा-पुराण मधूर, सुरस, उपदेशात्मक, कल्याणकारी, सन्मार्गदर्शक आहे. ते स्वकर्तृत्वीची जाणीव करुन देणारे, शुध्द आचरणाची जाणीव करुन देणारे असे सर्वांगसुंदर परिपुर्ण हितोपदेशी, दोषरहित असेच आहे.

**संस्कृत व प्राचीन काव्य-** जैन साहित्य अतिप्राचीन असल्याचे शिलालेखावरुन सिध्द होतेच. जैन साहित्य काव्यात देखील अग्रेसार व प्रभावी आहे. जैनकाव्य- गीते सुमधुर, नवरसानी युक्त, अलंकार युक्त व आदर्श आहेत. जैनकाव्य साधे, सोपे व उपदेशामृत युक्त असे आहे. ही काव्ये ऐकणाराला व गाणाराला स्फुर्ती मिळते. त्यातून प्रगती होते. महान अमोलिक तत्वे काव्यातून प्रतिपदित केलेली आहेत. जैन साहित्य नाटक, काव्य इ. मध्ये अग्रेसर होते.

प्राकृतमधील निबंध साहित्य- साहित्य गद्यात व पद्यात प्रामुख्याने विभागलेले असते. निबंधात्मक विपुल-साहित्य प्राकृतमध्येच आढळते. यामध्ये प्रामुख्याने धार्मिक व दार्शनिक विषयाची चर्चा मिळते. दिगंबर जैन साहित्याची भाषा शैरसेनी असून तिचे प्राचीनरुप भूतबलीकृत षट्खंडागम सुत्रात आहे. निबंध साहित्यातून पारिभाषिक शब्दावली, धर्म-दर्शन, नीति, तसेच समाज संस्कृति आणि इतिहास यांची माहिती मिळते.

**बहुभाषिक जैन साहित्य-** विविधता व प्राचिनता ही भारतीय संस्कृतीचे वैशिष्ठये आहेत. भारतात विविध धर्माचे, पंथाचे, भाषा बोलणारे अनेक लोक राहतात. जैन साहित्य फक्त प्राकृत व संस्कृत भाषेतच नसून ते विविध भाषांतून आढळते. बहुभाषिकता हे जैनसाहित्याचे प्रधान वैशिष्ठय आहे. जैन साहित्य, हिंदी, मराठी, तामीळ, तेलगू, कन्नड, गुजराथी, इंग्रजी इ. विविध भाषातून आहे. विविधता व प्राचीनता हे तर मुळात जैन साहित्याचे अधिष्ठानच आहे.

**जैन व्याकरण -** कोणत्याही भाषेची महत्ता, श्रेष्ठता ही व्याकरणावरच अवलंबून असते. व्याकरण, शुध्द भाषा ही प्रगत, संस्कारक्षम संस्कृतीचे लक्षण आहे. व्याकरणयुक्त भाषाशैलीवरुन साहित्याची उच्चता प्रभावीपणा, आदर्श ठरत असतो. जैन व्याकरण हे आदर्श आहे. 'प्राकृत लक्षण ' हा व्याकरणातील प्रथम ग्रंथ होय. व्याकरणयुक्त रचना ही प्रथम जैनाचीच आहे. समंतभद्रचार्यानी व्याकरणावर ग्रंथ लिहिला असून हेमचंद्रानी बाराव्या शतकात 'शब्दानुशासन' हा व्याकरण ग्रंथ लिहिला. जैन व्याकरण हे निर्दोष, सर्वांगपरिपूर्ण अचूक असे आहे. त्यामुळेच जैन साहित्य अग्रेसर ठरले.

**जैन साहित्याचे इतिहासातील स्थान -** भारतीय इतिहास एकीकडे महाप्रलय कालाला भिडला आहे तर दुसरीकडे आधुनिक कालाला येऊन भिडतो. जैन साहित्याचा प्राचिन श्रमण संस्कृतीशी अतूठ संबंध आहे. जैन साहित्यातील समस्त ग्रंथ उत्पति कालापासून आजपर्यंत प्रायः जसेच्या तसे उपलब्ध आहेत, यामुळे जैन साहित्य ऐतिहासिक दृष्टीने अधिक प्रमाणिक आहे याची जाणीव होते. जैन साहित्यात कर्मकांडापेक्षा सदाचाराला अधिक महत्व. जग हे अनादिनिधन-अकृत्रिम आहे. जैन साहित्याला फार मोठा इतिहास असून तो सर्व भाषात व सर्व जातिच्या लेखकांनी लिहलेला आहे. जैन साहित्याला प्राचिन परंपरा

आहे. जैन साहित्याने अखिल जागतिक साहित्यामध्ये सर्वश्रेष्ठ मानाचे स्थान अपूर्व सेवा करुन मिळाविले आहे. जैन साहित्याचे कोटयावधी ग्रंथ विविध भाषांत विपूल प्रमाणात आहेत. जैन साहित्य अपूर्व व अगाध असल्याने त्याला इतिहासात सर्वश्रेष्ठ स्थान आहे.

**जैन स्तोत्र साहित्य -** जैन अदिपुराणातील कथा म्हणजे प्राचीन इतिहासाचा ज्ञानकोशच आहे. जिनसेनानी पुराणास सत्कथा म्हटले आहे. कथा, द्रव्य, क्षेत्र, तीर्थ, काल, भाव, महाफल व प्रकृत या सात अंगानी युक्त आहे.

जैन स्तोत्रराशी मौक्तिकमण्याप्रमाणे जैन वाङःमयात इतस्ततः विखुरलेली आहेत. पंचस्तोत्र, भक्तामरस्तोत्र, जिनवाणीसंग्रह इ. जैन स्तोत्रे इतर धार्मियाप्रमाणे ऐहिक, भौतिकवादी, मारण-तारणसाठी उपयोगिलेली नसून केवळ मनःशांती, आत्मतुष्टी, पापमुक्ती, अष्टकर्महानि, निर्वाणप्राप्ती हा त्याचा हेतू आहे. यामध्ये भगवंताची स्तुति, जिनसामान्यस्तुति, विशेष जिनस्तुति, निःपक्ष जिनस्तुति, तर्कप्रधान जिनस्तुति, तीर्थंकर स्तुती, अध्यात्मपरस्तोत्र, न्यास स्तुति मंत्रस्तुति, घटनापर स्तोत्र इ. पध्दतीची स्तोत्ररचना आढळतो. भगवान भद्रबाहू, कुंदकुंद, उमास्वामी, समंतभद्र, सिध्दसेन, पूज्यपाद, अकलंक, विद्यानंद, अमितगती, अशाधर, धर्मघोष, धनंजय, मानतुंग, हेमचंद्राचार्य, पद्मानंदी या काव्य रसिकानी यामध्ये आमूलाग्र क्रांति केली आहे.

**जैन साहित्य व सौंदर्य-** जैन साहित्याचा कल निवृत्तीप्रधान आहे. साहित्याची छटा, सौंदर्य जाणून धेण्यासाठी त्याचे सम्यक् दर्शन करुन धेतले पाहिजे. जैन साहित्यात चिरशांतीचाच शोध घेतलेला आहे. साहित्य जीवननिष्ठ आहे. जैन साहित्याने सामाजिक, अध्यात्मिक जीवनमार्ग दाखविलेला असून त्यास महान आत्मिक प्रतिष्ठा आहे. साहित्य जीवनव्यापी रव सर्वस्पर्शी सौंदर्याने परिपूर्ण आहे. जैन साहित्यास भाषिक, ज्ञानिक, अनुीावात्मक महान सौंदर्य प्राप्त झालेले आहे. साहित्य विविध रस व भाषाशै्लीने युक्त आहे, योग्य वेळी अचूकपणे योग्य नवरसाची उपयुक्तता हा साहित्याचा स्वभाविक गुण आहे.

**श्वेतांबर जैन आगम साहित्य-** भ. महाविरांचा उपदेश, गणधरांनी आगमाची रचना करुन शब्दबध्द केला असे श्वेतांबर जैन मानतात. हे आगमग्रंथ अर्धमागधीत असून भाषाशास्त्राच्या दृष्टठीने अत्यंत प्राचीन समजेल जातात. त्यांची संख्या जवळजवळ ४६ आहे. कालप्रवाहात अनेक आगम ग्रंथ नष्ट झाले असले तरी उपलब्ध आगमग्रंथाच्याद्वारे जैन परंपरा, आख्यायिका, लोककथा, तत्कालीन रीतिरिवाज, धर्मोपदेशाची पध्दती, आचार-विचार, संयमपालविषयक पध्दती इत्यादि विषयांसंबंधी माहिती आपल्याला मिळते. आगम साहित्यासंबंधीचे विस्तृत विवेचन करण्याचा या भागात यथाशक्ति प्रयत्न केला गेला आहे.

**जैन लोकगीते-** जैन साहित्य व तत्वे सामान्यातील सामान्य मानवपर्यंत पोचविण्यासाठी लोकगीते हा माहान प्रभावी मार्ग आहे. जैन साहित्य केवळ कथा, पुराण, आध्यात्म यांतच तें अग्रेसर नसुन तें लोकगीतांच्या रुपाने सामान्यांच्या मुखात घोळत आहे. साहित्यात खास सूर, ढब, लकब आहे. लोकगीते अतिप्रभावी व मनोरंजनमय सुंदर आहेत. दैनंदिन कार्यात जैनतत्वे लोकगीताच्या रुपाने दृढमूल झालेली आढळतात. जैन लोकगीतातून आपणाला समाजाच्या विविध अंगाचे स्वरुप पाहावयास मिळते. विविध लोकगीताततून जैनतत्वे, समाजाचे रीतिरिवाज, चालीरुढी, परंपरा, आचारधर्म, उस्तव, तीर्थक्षेत्र, यात्रा याविषयीची माहिती मिळते. स्त्रीजीवनाचे खरेखुरे प्रतिबिंब लोकगितातच स्पष्ट झालेले आहे. लग्नविधी संस्कार, जात्यावरील गाणी, पंचमीच्या वेळी, फेरी धरल्यावर, मुलाचे नाव ठेवताना इ. विविध दैंनदिन क्रियात, उत्सवात, सणाचे वेळी जैन लोकगीते प्रभावी व सरसच ठरलेली आहेत. सामान्य जनतेसाठी आधुनिक विद्वान कवीनी जैनतत्वज्ञान लोकगीताद्वारे विपूल प्रमाणात निर्माण करुन पोचविण्याचे महान कार्य हाती घ्यावे असे अवाहन आहे.

**अर्ध्य ६ वा : आधुनिक विज्ञान व जैनधर्म-**

आधुनिक युग हे वैज्ञानिक सुधारणात्मक युग आहे. प्रत्येक गोष्ट मानव प्रयोगाच्या द्वारे सिध्द करुन पहात आहे. जैनधर्माने अध्यात्मवाद, भौतिकवाद सायन्सच्याद्वारे सिध्द करुन दाखविलेले आहे. आधुनिक सायन्सचा, वैज्ञानिक ज्ञानाचा उगम जैनसाहित्यातूनच झालेला आहे. जैनधर्मातील प्रत्येक तत्व, आचार, विचार शास्त्रशुध्द आहे. आजच्या विज्ञानाची जननी जैनसाहित्यच आहे. त्यामुळे मानवाला धर्माची तत्वे स्पष्ट व प्रात्यक्षिक तसेच संशोधन करुनच पटतात. जैनतत्वज्ञान आंधळेपणाने श्रध्दा ठेवण्यास सांगत नसून प्रत्येक तत्त्व संशोधन, प्रात्यक्षिक करुन बुध्दीला पटल्यासच अनुसरावे असा आग्रह जैनसाहित्याने धरलेला

आहे. ज्या विज्ञानाचा उगमच जैनसाहित्यातून झालेला आहे त्याची तत्वे हीसुध्दा प्रात्यक्षिके करुन व संशोधन करुन प्रतिपादिलेली असणार यात तिळमात्रही शंका नाही. तत्त्वे, प्रात्यक्षिके व संशोधन करुनच अनुभवलेली आहेत. त्यामुळे ही अनुभवसिध्द व शास्त्रीय पायावर अधिष्ठितच आहेत. त्यामुळे हे जैनतत्वज्ञान शास्त्रशुध्द, निर्मळ व स्पष्ट आहे. प्रत्येक जैनतत्व विज्ञानाच्या कसोटीत यशस्वी झाल्याचे आढळते. विज्ञान हे धर्माच्या अभावी आंधळे आणि धर्म हा विज्ञानाच्या अभावी लंगडा आहे. दर्शन व विज्ञान या दोहोंचे ध्येंय एकच, सत्याचा शोध घेणे हा आहे. जीवन आणि विश्व यांच्या अनंत रहस्याचे विवेचन जैनाचार्यांनी वैज्ञानिक पार्श्वभूमीवर केलेले आहे. विज्ञान, रसायन, जीवशास्त्र, ज्योतिर्विज्ञान, गणित, काव्य, व्याकरण इ. क्षेत्रात सुसंबध्द व विपुल ग्रंथरचना आहे. अविरत सुखाच्या शोधात गुंतलेल्या विज्ञाननिष्ठ मानवाने जरी विज्ञानाच्या साहाय्याने सुखसमुध्दीची साधनसामग्री गोळा केली तरी खऱ्या अर्थाने सुख मिळाले नाही हे आपण पाश्चात्य राष्ट्रांच्या उदाहरणावरुन अनुभवतोच आहोंत. गणितशास्त्रत जैनाचार्य आघाडीवरच आहेत.

**पदार्थविज्ञान व जैनधर्म-**

**जैनमर्धातील परमाणुवाद -** पाश्चात्य देशात असे समजतात कीं डेमोक्रेटसने इ.स.पू.४६०-३७० अणू परमाणूची कल्पना प्रथम मांडली. परंतू त्याही पूर्वी जैनदर्शनाचा अणू परमाणूविषयी सुसंबध्द व विस्तूत सिध्दांत मांडण्यात आला आहे. सायन्सने फक्त प्रयोगाद्वारे अणुपरामाणूविषयी अल्पसा अभ्यास केलेला आहे. परंतू परमाणु व स्कंध यांचा अतिसुक्ष्म अभ्यास जैनधर्माने अतिप्राचीन काळीच केलेला आहे. परमाणू म्हणजे ज्याला अदि, मध्य, अंत नाही; जो इंद्रिय ग्राहय नाही, जो अविभागी आहे. आधुनिक अणूपेक्षा सुक्ष्मतम परमाणू व स्कंध यांचा जैनधर्माने शोध लावून ठेवलेला आहे. हजारो वर्षापूर्वी अतिप्राचीन जैनधर्माने पुनर्जन्म सिध्दांत्न मांडला परंतू १८११ मध्ये वैज्ञानिकानी परमाणू परिवर्तनशील आहेत हे सिध्द केले. प्रयोगानेचे विज्ञानाने पुनर्जन्म सिध्द केलेला आहे. या आणूमधून शास्त्रज्ञानी आणुबॉम्बचा शोध लावला. परंतू दुर्दैव हे की या भौतिक अणूचा विनाशासाठीच या आधूनिक मानवाने विकास केलेला आहे. दर्शनामध्ये वर्णिलेला अणु अजून शास्त्रज्ञाना सापडलेला नाही. सदर ग्रंथात स्कंध कसे होतात, परामाणूची रचना, गती व शक्ती यांचे स्पष्ट चित्रण केलेले आहे.

**पुद्‌गल : विज्ञानाची क्रीडा : विश्व -** साधारणपणे पुद्‌गल ज्याला विज्ञानात Matter म्हणतात त्याचे त्यानी धन द्रव व वायु असे तीन प्रकार मानले आहेत. संशोधन अजून फारच व्हावयाचे आहे. परंतु जैनदर्शनात पुद्‌गलाचे ६ प्रकार आहेत ते अधिक सूक्ष्म व स्पष्ट वाटतात. त्यादृष्टिने शास्त्रज्ञानी असून भरपूर संशोधन करुन पुद्‌गलाची कल्पना विस्तृत करावी. जैनदर्शनातील पुद्‌गलाचे वर्णन अति सूक्ष्म आहे. शब्द, बंध आदि जे प्रकार आहेत ते सर्व यथास्थित असून आधुनिक संशोधनाद्वारे (टेलीव्हीजन, ट्रॅन्झीटर) यामुळे त्याला पुष्टी मिळते. सुपूर्ण विश्व सहा द्रव्यानी भरलेले - निर्मित आहे- जीव, पुद्‌गल, धर्म, अधर्म, आकाश व काल. पुद्‌गल द्रव्य स्वतंत्र असून स्पर्श, रस, गंध, वर्ण हे त्यांचे गुणधर्म आहेत. एका पुद्‌गलाचे रुपांतर दुसऱ्या पुद्‌गलात करण्याचे श्रेय वैज्ञानिक प्रयोगाद्वारे साधले. (उदा. पायऱ्या रुपांतर सोन्यामध्ये करणे). पुद्‌गलाचा बंध कसा होतो? अणूची निर्मिति कशी होते ? पुद्‌गलाचे उत्पाद, व्यय, ध्रौव्य अदि गुण विज्ञानामध्ये निश्चल आहेत. आकाशादिकांची गणना अधर्म द्रव्याची मान्यता, अलोकाकाशाचे स्वरुप इ. वैज्ञानिकानी जैनशास्त्र जरी पाहिले नाहीत तरी त्यांनी संशोधनातून जगापुढे मांडले आहेत. त्याचे मूळ जैनशास्त्रातच आहे. त्यासाठी अधिक संशोधन व प्रात्याक्षिकासाठी वैज्ञानिकानी जैनशास्त्राचा अभ्यास करणे आवश्यक वाटते. शरीर हे नश्वर आहे. आत्मा हाच नित्य आहे हा सिध्दांत शास्त्रज्ञानी प्रात्यक्षिकाद्वारे सिध्दच करुन दाखविला आहे. पुद्‌गल द्रव्य हे वैज्ञानिकाचे महान संशोधनाचे विश्व आहे. परंतजु तेच जैनशास्त्रातील सूक्ष्मसा भाग आहे. मी कोण आहे. कोठून आलो ! इ. प्रश्नांचे उकलन शास्त्रज्ञानी प्रयोगाद्वारे सिध्द केले आहे. पूर्वजन्माची आठवण ठेवणारे कांही मानव त्यांना आढळले आणि त्यांना या सर्व घटनेमध्ये कोणती तरी वेगळी शक्ति कार्य करीत असल्याचे आढळून आले. त्याचा शोध मनोविज्ञानीकांनी घेतला व भौतिक पदार्थापासून संपूर्णपणे भिन्न अशी अदभूत शक्ति आहे. कित्येकांनी त्या शक्तीचा शोध घेण्यासाठी जिवंतपणी व मरणानंतर मानवी शरीराचे वजन घेतले. शरीराभोवतीच्या वलयाचा अभ्यास केला. मेंदूचा विशेष अभ्यास केला पण आत्म्याचा स्पर्श कोणालाही झालेला नाही. त्याचा गंध कोणला आला नाही. विज्ञानाला आत्म्याचे अस्तित्व असल्याची जाणीव निश्चितपणे झालेली आहे. जैनशास्त्रत सहा द्रव्याचे वर्णन यथार्थ व संगोपांग केलेले आहे, याच्या अभ्यासाने वैज्ञानिकांना फार मोटा फायदा होणार आहे.

जग अनादि असून कर्मबंधही अनादि आहे. त्यामुळे जीव पुनर्जन्म धारण करतो. पुनर्जन्म धारण करतेवेळी जुने शरिर सोडतो. प्लोटोने स्पष्ट केले की आत्मा शरीरात पूर्वीपासून आहे. आत्मा सतत या जगामध्ये जन्म घेत फिरत असतो. जर्मन शास्त्रज्ञानी देखील जीवाला पुनर्जन्म असल्याची स्पष्टता केलेली आहे व प्रत्यक्ष अनुभवही आहेत. पू. म. गांधीच्या धर्मगुरुस-श्रीपाद् रामचंद्र यांना जातिस्मरण झाले होते. अशी अनेक उदाहरणे आहेत. वैज्ञानिकानी अजून संशोधन केल्यास पुनर्जन्माबाबत पुष्कळ स्पष्टीकरण होईल.

**भूतपिशाच्च -** जैनचार्यांनी व्यंतरदेवाचे- किन्नर, किंपुरुष महारोग, गंधर्व, यक्ष, राक्षस, भूत, पिशाच असे प्रकार सांगितले आहेत. त्यांचे शरीर मनुष्यासारखे नसते. ते वाटेल तसे आकार ग्रहण करतात. आपल्या विद्येच्या बळावर ते कलह, कोलहाल निर्माण करतात. मनुष्याच्या शरीरात प्रवेश करतात. पूर्वजन्मीचे वैर असेल तर संबंधितास त्रास देतात. जे आत्महत्या करतात, ज्यांची हत्या होते, मरतेवेळी ज्याची संक्लेष अवस्था होते, मरतेवळी ज्याची वासना राहिलेली असते, जे चंचल चित्त असतात ते भूतपिशाच्च होतात. आत्मा मरणानंतर कुठे जातो याच्या शोधांत वैज्ञानिकाना असे आढळून आले की तो मरणानंतर भूतही होतो. सर आर्थर कानन डायल याने भूताचे अनूभव लोकाना सांगितले. त्याने प्लँचेटवर भूताना बोलावले व त्यांचेकडून अनेक प्रश्न सोडवून घेतले. अशी अनेक उदाहरणे आधुनिक शास्त्रज्ञानी संशोधनाने दाखवून दिली आहेत. भूतपिशाच्च कल्पना जैनाचार्यानी फार प्राचीन काळी सांगितलेली आहे.

**कर्म कॉम्प्युटर-** जैनचार्यानीच प्रथम कर्मसिध्दान्त सांगितला. संपूर्ण लोकात कार्माण वर्गणा (कर्म परामाणूचा समूह) भरलेल्या आहेत. पुद्गल परिवर्तनशील असून ठराविक क्रमानुसारच आहे. त्याला जैनशास्त्रात क्रमबध्द पर्याय म्हणतात. दोन अरबवर्षानी युरेनियमचे रेडियममध्ये ( काही भागाचे परिवर्तन होते) सजीव आणि निर्जिव द्रव्य एकत्र आल्यावर जे काही घडते ते जाणणे शक्य आहे. उदा-एका मनुष्याच्या मनात क्रोध निर्माण झाला. क्रोध निर्माण करणाऱ्या वर्गणा पुद्गल आहेत. त्या जाणून घेतल्यास जीवाचा क्रोध कमीअधिक प्रमाण जाणणे शक्य होते. नाही तरी हृदयाच्या परिस्पंदा (कंपना) वरून रोगी माणाच्या रोगाचे व मन:स्थितीचे अनुमान करता येते. मेंदूच्या कंपनावरुन (हालचालीवरुन ) विचाराचे तर्क करण्याचे तंत्र विज्ञानाने शोधून काढले आहे. जैनदर्शनातील कर्म-विज्ञानातील प्रकृति-स्थिती-प्रदेश व अनुभाग यावर विचार केला तर त्यातील क्रम लक्षात येतो. गणित पध्दतीने भूत, भविष्य, वर्तमान पर्याय काढता येतात. हे विचार म्हणजेच कॉम्प्युटरच्या कल्पनेचा उदय. लेश्या हा कॉम्प्युटरचा मुख्य भाग आहे.

**पृथ्वीचा आकार -** जैनशास्त्रात पृथ्वीचा आकार कमरेवर दोन्ही हात ठेवून उभा असलेला पुरुष असा सांगितलेला आहे. याबाबत शास्त्रज्ञानी निरनिराळी मते मांडली की पृथ्वी चपटी आहे, गोल आहे. खऱ्या पृथ्वीच्या आकाराच्या कल्पनेसाठी शास्त्राला जैनशास्त्राचा अभ्यास करुन संशोंधन करण्याची नितांत गरज आहे.

**मंत्रशास्त्र, स्वप्नशास्त्र व शरीरशास्त्र -** मंत्रशास्त्र हे जैनागमात श्रेष्ठ असे वर्णिले आहे. जगात वावरताना अनेक अडचणीवर मात करुन आत्मकल्याण करुन घेण्यासाठी मंत्रशास्त्र सांगितले आहे. त्याच्या साहयाने आत्मकल्याण व लैकिक सिध्दीही प्राप्त होते. मंत्रामुळे जीवन संयमित होते. मंत्रसाधना करताना आत्मकेंद्रीत झाले पाहिजे. ११व्या १२व्या शतकात मंत्रशास्त्राचा जैनागमात उल्लेख सापडतो. मंत्रसाधनेचा प्रधान हेतू आत्मकल्याणच आहे. मंत्राचे ढोबळ मानाने स्तंभन, मोहन, उच्चाटन, वशीकरण, जृम्भण, विद्वेषण, मारण, शांति, पौष्टिक असे प्रकार वर्णिले आहेत. कल्याणकारी एकच महान मंत्र 'पंचणमोकार' मंत्र विश्ववंद्य, आत्मकल्याणकारी असा आहे. तो सर्व मंत्राचा महामंत्र आहे.

स्वप्नं का पडतात. त्याचे प्रकार, फल याचे विवेचन जैनागमात सविस्तरपणे केलेले आहे. आपणाला सतत स्वप्नें पडत असतात. त्याद्वारे आपण भविष्यकाळ, भूतकाळ पहात असतो, अनुभवत असतो. परंतू याचे मूळ, स्वप्ने का पडतात याचा खरा शोध वैज्ञानिकाना लागलेला नाही. जैनागमानुसार स्वप्नांचे अंतरंग कारण ज्ञानावरण, दर्शनावरण व अंतराय कर्माचा क्षयोपशम तसेच मोहनीय कर्माचा उदय आहे.ज्या जीवाचा क्षयोपशम जसा असेल तास सवप्नाचा तीव्र-मंद प्रभाव, सत्यता आढळून येते. स्वप्नांचे दोन प्रमुख प्रकार १) स्वस्थ अवस्था असणारे २) अस्वस्थ-विकृत अवस्था असणारे. स्वप्न फल, स्वस्थ अवस्थेत पडणारे स्वप्न सत्य व अस्वस्थ अवस्थेत पडणारी स्वप्ने असत्य असतात. यासाठी जैन स्वप्नशास्त्राचा अभ्यास करणे किती महत्वाचे आहे हे सिध्द होते.

**शरीर -** आपल्याला दिसते ते पुद्‌गल शरीर. अनादिकालापासून आत्म्याचा कर्माशी संबंध आला आहे. तेव्हापासुन त्याने शरीर धारण केले आहे. १४ मार्गणा संशोधन प्रकार सांगितले आहेत. विग्रहगतीपासून मृत्यूपर्यंतचे वर्णन केलेले आहे. गर्भात आल्यापासून त्यांचा अंत होईपर्यंतच्या सर्व अवस्थांचे वर्णन जैनाचार्यांनी केले आहे. शरीराशास्त्राचे आधुनिक शोध फारच अपुरे आहेत. जन्म घेताना जीवाची-शरीराची गती, जन्म कसा झाला, कुठे झाला, अवस्था विचार, ज्ञान, भाषा, पाच इंद्रिये, मन, गती, शरीर, योग याचे समग्र वर्णन केले आहे. शरीराची रचना ही नामकर्माच्या कलानुसार होते. आपला असा चुकीचा भ्रम आहे की परमेश्वरच आपणाला सुरुप, कुरुप,नकटे, रोगी निरोगी शरीर देतो. परंतु जैन शास्त्राच्या मते हे सर्व असत्य आहे. आपणाला कोणीही कांही देत नाही. जर तो देणारच असता तर त्याने मानवता दुजाभाव का निर्माण केला असता? एकाला सुखी दुसऱ्याला दुःखी का ठेवले असते? यावरुन परमेश्वर आपणाला शरीर, सुख,दुःख, संपत्ती देतो हे म्हणणे निव्वळ खोटे असल्याची सत्यता पटते. सर्व कांही आपल्या कृतकर्माच्या फलानुसार मिळत असते. शरीर नामकर्माच्या तर आयुष्य हे आयुकर्माच्या फलानुसारच मिळत असते. आपण केलेल्या चांगल्या वाईट कृत्यांच्या फळापासून सर्व कांही प्राप्त होत असते. हाच मौलिक सिध्दान्त जैनशास्त्रत प्रामुख्याने वर्णिला आहे. आपल्या कर्मानुसार फळ मिळत असते. कोणी आपल्याला कांही देत नाही. शरीरशास्त्रातील शरीररचना व जैनशास्त्रातील शरीररचना याची आधुनिक पध्दतीने तुलना, आकार, संहनन शक्ती इ. चा समग्र विचार केलेला आहे.

**जैन वनस्पती विज्ञान** - ज्या युगात आधुनिक विज्ञानाचा उगम देखील झाला नव्हता अशा अतिप्राचीन काली जैनागमाने वनस्पतीस आहार, निद्रा भय, मैथून, परिग्रह, क्रोधदि प्रवृत्ती असल्याचे स्पष्टपणे सांगितले आहे. वनस्पतीस जीव असतो. सजीवाच्या सर्व क्रिया वनस्पतीत अंतर्भूत असतात. वनस्पति हे एकेंद्रिय जीव आहे. त्यास शुभ-अशुभ भाव असतात. वनस्पती श्वासोच्छवास करतात. इतर प्राण्याप्रमाणे प्रजनन, संभोग, गर्भाधान या क्रिया वनस्पतीत असतात, याचे हजारो वर्षापूर्वी जैनशास्त्रात स्पष्ट वर्णन केल्याचे आढळते. आज विज्ञानाने प्रयोगाद्वारे याची सिध्दता अनुभवलेली आहे. वनस्पतिकायिकाचे प्रमुख दोन भेद १) सुक्ष्म २) बादर. वनस्पतीचे समग्र वर्णन हजारो वर्षापूर्वी विज्ञानाच्या उगमापूर्वी केलेले असल्यामुळे व आज त्याची प्रचिती विज्ञानाने सिध्द झाल्यामुळे निर्विवाद वनस्पती विज्ञानाचे अद्यप्रणेते जैन ग्रंथच होते,हे निर्विवाद आहे. आधुनिक विज्ञान शास्त्राज्ञांनी वनस्पतिशास्त्राच्या सखोल संशोधनासाठी जैनशास्त्राचा अभ्यास करणे फारच आवश्यक आहे.

**जैन ज्योतिष-** जैन ज्योतिष परंपरा इ. स. पूर्वकालापासून चालत आलेली आहे. ज्योतिष शास्त्र व तत्संबंधीचे इतर अंगाचे अनेक ग्रंथ आहेत. मंडल प्रवेश, ज्योतिष करंडक, जन्मपत्र साधन, लोकविजय यंत्र, पंचांग तत्व, सूर्यप्रज्ञाप्ति, चद्रप्रज्ञप्ति इ. ग्रंथ अत्यंत महत्वाचे आहेत. हजारो वर्षापूर्वी सूर्यचंद्र, ग्रह, अयन, वर्ष, दिवस, रात्र इ. विषयी ज्योतिषशास्त्रात वर्णन केलेले आहे. जैन ज्योतिषशास्त्र प्रगत, सर्वांग परिपुर्ण आहे. जैन जोतिषाचा केंद्रबिंदू मेरु आहे. तर इतरांचा ध्रुव, ग्रह, नक्षत्र हा आहे. हस्तसामुद्रिक, रमलशास्त्र, निमित्तशास्त्र, जातक, यंत्र, पंचाग इं. सर्व क्षेत्रातून ग्रंथरचना केलेली आहे. जैन ज्योतिषशास्त्राचा हेतू मौलिक नसून मुख्यतः आध्यात्मिकच आहे. सर्व जैन ज्योतिष साहित्यात संक्षेपाने मुहूर्त, सामुद्रीक शास्त्र, प्रश्नशास्त्र, निमित्तशास्त्र, अंकगणित, बीजगणित, रेखागणीत, पंचाग निर्माण गणित, स्वप्नशास्त्र इ. बाबत महत्वाचे विवेचन आढळते. ज्योतिषशास्त्र हे भारतीय संस्कृतिचे महान वैशिष्ठय आहे. त्याचा सखोल व संशोंधनात्मक पद्धतीने अभ्यास केल्यास अत्यंत मौल्यवान शोध लागतील व त्याचा आधुनिक मानवाला अत्यंत उपयोग होणार आहे.

**जैनभूगोल-** अधुनिक भूगोल हा जैन भुगोलाचा अल्पसा भाग आहे. जैन भूगोल अति व्यापक व अगाध आहे. जैनभूगोलामध्ये लोक अलोकाकाशाचे समग्र वर्णन केले आहे. जैन भूगोलात ऊर्ध्व, मध्य, अधो तिन्ही लोकांचे व तेथील वातावरण, पर्वत, नदया, माणसाचे राहणिमान इ.चे सविस्तर वर्णन हजारो वर्षापुर्वी केलेले आहे. मानवाला फक्त मध्य लोकातील काही भागाचे शोधाच्या साहयाने ज्ञान झालेले आहे. जैनभूगोल हा अनंत आहे. त्याचा अभ्यास आधुनिक तज्ञानी केला तर अनेक दिव्यत्वाचे शोध लागतील. यामध्ये वैदिक परंपरागत भूगोल, बौध्दपरंपरागत भूगोल यांचे समग्रपणे तुलनात्मक, अभ्यासपुरक विवेचन केलेले आहे.

**जैन आयुर्वेद व शरीरशास्त्र-** न्याय, व्याकरण, सिध्दांत इ. विविध विषयात ज्याप्रमाणे जैनधर्माने असामान्य, अलौकिक कार्य केले आहे त्याचप्रमाणे आयुर्वेद शास्त्रातही महान कार्य केलेले आहे. भ. आदिनाथांनी पुरुषाची लक्षणे, शरीराशरीरामधील फरक, दोषोत्पत्ति, चिकित्सा व कालभेद इ.चे सविस्तर वर्णन केलेले आहे. हाच आयुर्वेदशास्त्राचा उगम आहे. आयुर्वेदशास्त्राची परंपरा प्रमाणित आहे. हे काही कपोलकल्पित शास्त्र नसुन भगवंताच्या दिव्यध्वनीतून निर्माण झालेले हे शास्त्र, श्रुती व स्मृतीच्या साहयाने प्रवाहित राहिलेले आहे. चौदापुर्वामध्ये प्राणवायू भागातच आयुर्वेदाचा अंतरभाव झाला आहे. त्यात काय, शल्य, शालाक्य चिकित्सा, भुतविद्या, कौमारभृत्य, अगदतंत्र, रसायनतंत्र, वाजीकरण इ. चे समग्र वर्णन आहे.

जीवादिक समस्त पदार्थाचे लक्षण जे केवलज्ञान त्यास विद्या म्हटले आहे. त्या विद्येमुळे ग्रंथाची उत्पत्ति झाली असल्याने त्यास वैदयक ग्रंथ व त्याचे अध्यायन करणाराला वैद्य म्हणतात. आयुर्वेदात मानवाच्या आयुष्य विषयक सर्व गोष्टींचा उहापोह केलेला आहे.

जैन आयुर्वेदात मद्य,मांस व मधुचे सेवन कोठेच सांगितले नाही तर केवळ वनस्पती, खनिज, क्षार, रत्नादिक पदार्थ, त्यापासून बनविलेली मिश्रणे यांचाच औषध म्हणून उपयोग करण्यास सांगितले आहे. आजच्या आयुर्वेदातील सिध्दौषधी म्हणजेच जैनाचार्याच्या अगाध प्रतिभेचे अविश्रांत परिश्रमाचे फळच आहे. रसशास्त्र, प्राणीशास्त्र, निघुंट, औषधिगुणधर्म शास्त्र इ. अनेक शास्त्राची निर्मिती करुन आयुर्वेद शास्त्रात जैनाचार्यानी महान कार्य केलेले आहे. आयुर्वेदशास्त्र अनेक महान, दुर्दम्य, विघातक, भयंकर रोगावर यशस्वी झालेले आधुनिक विज्ञानाने देखील सिध्द होत आहे. श्रुतर्कीर्ती, कुमारसेन, विरसेन, मेधनाद, सिंहनाद, समंतभद्र, जटाचार्य इ. आचार्यानी आयुर्वेद शास्त्रावर विपूल ग्रंथ लिहलेले आहेत. आयुर्वेदशास्त्र संस्कृत, कन्नड, तेलगु, मराठी, हिंदीं, तामिळ इ. विविध भाषात रचना झालेली आहे. आज विदयानयुगात महाभयंकर असाध्य रोगापुढे विज्ञानाने हात टेकले परंतू त्यावरील शोध वैद्यकशास्त्रात हजारो वर्षापूर्वी जैनाचार्यानी लिहून ठेवलेले आहेत. मधुमेहासारखे, कर्करोगासारखे व त्वचेचे अनेक असाध्य रोगांचे निदांन व उपाय याची समग्र माहिती आयुर्वेदात आढळते. आयुर्वेदातील गुणौषधीने असाध्य रोग तर बरे होतातच परंतू त्याचे समुळ उच्चटनच होते. आयुर्वेदशास्त्र शुध्द शास्त्र आहे. त्यासाठी आयुर्वेद शास्त्राचा तरुण पिढीने सखोल अभ्यास करुन समाजाला त्याचा उपयोग करुन देण्याची नितांत गरज आहे.

**जैनगणित -** जैनगणित शास्त्रात लौकिक गणितामध्ये संख्यामापन, अष्टपरिकर्माचा समावेश होतो. म्हणजेच क्षेत्र, काल, धान्य, वस्तू मापनाच्या पध्दति तसेच समाकलन, व्यकलन इ. अष्ट परिकर्माचा समावेश होतो. पण याहीसारखे आश्चर्य वाटण्यासारखे आणि जैनगणिताच्या प्रगतीची साक्ष देणारे अलौकिक गणित आहे. धवलादि ग्रंथात अलौकिक गणिताचा आधार प्रथम घेतलेला आढळतो. सर्वसाधारण लैकिक गणितात 'अनंत ' संख्येचा उपयोग केलेला दिसतो. पण अनंताचे परितानंत, युक्तानंत, अनंतानंत प्रमाण पाहिले कीं हे अलौकिक गणित खरोखरच अलौकिक असल्याचे आढळून येते. तिलोयपण्णत्ति, जंबूदीवपण्णत्ति, गोम्मटसार इ. ग्रंथात अलौकिक गणिताचा उपयोग केलेला आढळतो. आ. भद्रबाहू यांचे सूर्यपज्ञप्ति व भद्रबाहूसंहिता ( इ.स.पूर्व ३०० वर्षे) आणि आठव्या शतकातील श्री महावीराचार्यांचे गणितसारसंग्रह अत्यंत महत्वाचे आहेत. या आगोदर अशी समजूत होती की आर्यभट्ट हा गणितशास्त्राचा पुरस्कर्ता आहे. पण जैनगणित शास्त्राचा शोध लागल्यानंतर गणितशास्त्र परंपरा प्राचिनकालापासून होती हे समजले. म्हणूनच प्रो. रंगाचार्य जे जागतिक कीर्तीचे गणितज्ञ आहेत त्यांनी गणितसार संग्रहाचा प्रचार जगभर केला.

इ.स. पूर्व २००० वर्षापूर्वीपासून अंकगणितात कोष्टके, वर्ग, वर्गमूळ यांच्यासहित उपलब्ध आहेत. इ.स.पूर्व ४००० वर्षापूर्वी अरब देशात अवशेष सापडले. त्याकाळचे तिथिपत्रही उपलब्ध आहे ज्यामध्ये ३० दिवसाचा महिना, १२ महिने, ३६५ दिवसाचा वर्ष दाखविले आहे ( ५ दिवस ज्यादा मिळवून). कोटीच्या संख्येपर्यंतची अंकगणना त्याना माहित होती असे दिसते. दशांश पध्दतीचाही त्यानी स्वीकार केला होता. बीजगाणीताचे इ.स.पूर्व २००० चे अवशेष आजही आहेत. अर्किमिडीज हा गणितज्ञ होऊन गेला. ग्रीस देशात पायथागोरस हा तज्ञ होऊन गेला.

इ.स.पू.४०० च्या सुमारास भारतातील गणितशास्त्रस चालना मिळाली कारण त्यावेळी सूर्यसिध्दान्त व पैनासिध्दांत लिहिले गेले. नंतर इ.स.पू.२०० वर्षे पिंगलाने चंद्रसूत्र लिहिले. त्यात त्याने दशमान पध्दतीचा अवलंब केला. पाचव्या शतकात आर्यभट्ट हा जगप्रसिध्द गणितज्ञ होऊन गेला. सदर ग्रंथात समग्ररुपाने गणितशास्त्राचा उगम, इतिहास, महत्व याचे वर्णन करण्याचा प्रयत्न केला आहे. यावरुन असे स्पष्ट होते की

जैनगणितशास्त्रच आधुनिक गणिताचे मूळ उगमस्थान आहे. लौकिक गणितापेक्षा श्रेष्ठ व विस्तृत असे अलौकिक गणित आहे त्याचा अभ्यास गणित-तज्ञानी करणे फारच जरुरीचे आहे. डॉ.लक्ष्मीचंद जैन यानी या गणितशास्त्राचा सखोल अभ्यास व संशोधन केलेले आहे. त्यापासून नवयुवकानी स्फूर्ति घेऊन नवगणित ज्ञानाचा चिकाटीने अभ्यास करायला हवा.

**जैन राजनीति व शासनसंस्था-**

जैन लोक केवळ त्यागमार्गीच आहेत असा गैरसमज लोकात आहे. परंतू सर्वच तीर्थकर हे क्षत्रिय कुलोत्पन्न असून वृत्तीने क्षत्रियच असतात. गृहस्थावस्थेत सुंदर शासनसंस्थेचा आदर्श जगापुढे ठेवतात. पण त्यानी जर जैन राजनीति व शासनसंस्था या भागाचा (जैनशास्त्रातील) अभ्यास केला तर ते केवळ त्यागीच नूसन महान पराक्रमी, चक्रवर्ती, अजिंक्य असे शूरवीर होते व आहेत याची प्रचीति येते. जैनग्रंथात राजा कसा असावा, न्यायव्यवस्था, आंतरराष्ट्रीय संबंध कसा असावा हे प्रत्यक्ष अनुभवाने फार प्राचीन काळी नमूद केलेले आहे. जैनागमानुसार शासनसंस्था सर्वश्रेष्ठ असल्याचे आढळून येते. शासनसंस्थेची निर्मिति प्रथम वृषभदेवानीच केली. त्यानी दंडनीतीचे सात प्रकार सांगितलने. तर भरतचक्रवर्तीनी तुरुंगवास व अवयवच्छेदन या शिक्षांची सुरुवात केली. प्राचीनकाळी प्रजारक्षाणासाठी निर्व्यसनी, महापराक्रमी, लोकप्रिय राजा असणे आवश्यक होते. राजपद सामान्यतः वंशपरंपरागत होते. जैनग्रथांत राजा,युवराज,आमात्य, श्रेष्ठी व पुरोहित याना अनन्य महत्व होते. प्रजा सुखी आनंदी असे. सज्जनांचा, साधूंचा सन्मान होत असे प्राचीनकाळी हस्तियुध्द, अश्वयुध्द, मुष्टियुध्द, बाहूयुध्द, रथयुध्द, जलयुध्द इ. युध्दप्रकार होते.

निष्पक्षपणे न्यायदान करणे व दुष्टाचा नाश करणे हे राजाचे प्रमुख कर्तव्य होते. न्यायसंस्थेचे ते एक प्रमुख अंग होते. राजाचे न्यायालय हे सर्वश्रेष्ठ न्यायालय असून त्याठिकाणी निष्पक्षपातीपणाने, निस्वार्थपणे, न्याय मिळत असे. आचार्य सोमदेवानी या न्यायालयास सभा व सभासदाना सभ्य म्हटले आहे. यावरुनच पुढे सभा हा शब्द दृढ झाल्याचे आढळते. न्यायालयाद्वारे योग्य तपासणीशिवाय कोणत्याही व्यक्तीला शिक्षा होता कामा नये. आपला क्रोध शांत करण्यासाठी, बदला घेण्यासाठी, अपराध सिध्द न करता कोणत्याही व्यक्तीला शिक्षा करणे अयोग्य मानले जात होते. राजा न्यायप्रिय असे. जर स्वतःचा पुत्र प्रजेला पीडा देत असेल, अपराधी असेल तर त्यालाही कडक शासन केले जात असे. त्याठिकाणी हा माझा आहे ही भावना नव्हती. राजनीति आदर्श होती. मौर्यकालात प्राण्यांचा (हत्तीचा) वध करणाराला फाशीची शिक्षा दिली जात असे. जैनसूत्रामध्ये युध्द, नियुध्द, महासंग्राम इ. अनेक युध्दाचे प्रकार सांगितले आहेत. जैन राजनीति व शासनसंस्था आदर्श असल्याचेच आढळून येते. आधुनिक राजनीतितज्ञानी व राज्यकर्त्यानी जैनरानीति व शासनसंस्थाचा अभ्यास करण्याची व प्रजेची सेवा करण्याची सुसंधी दवडू नये. आचार्यानी राजनीति व लोकनीतीचा समन्वय केला आहे. समाजोन्नतीतच राष्ट्रोन्नती आहे हे प्राचीनकाली सांगितले आहे. यावरुन आजच्या लोकशाही तत्वाची मुळे जैनराजनीति व शासनव्यवस्था यात असल्याची प्रचीति येते. जैनराजे महाराजे होऊन गेलेले आहेत. षट्खंडाचे अधिपती भरतचक्रवर्ती होते. यावरुन जैन हे शूर वीर पराक्रमी होते याची प्रचीति येते.

**जैनकायदा-** जैनकायदा हा हिंदू कायद्यापेक्षा स्वतंत्र असून अतिप्राचीन आहे. भ. वृषभदेवानी समाजातील अराजकता नष्ट करुन शास्त्रा, शासन, विविध शास्त्रे इत्यादींची निर्मिती करुन, समाजिक शांतता प्रस्थापित करण्याचे पहिले कार्य केले. शांतता प्रस्थापित करण्यासाठी विधिसंहित तयार करण्याचे महान कार्य त्यानीच प्रथम केले आहे. भ. वृषभनाथ हे कायद्याचे मूळ संस्थापक आहेत. कायद्याची चौकट ही समाजाने स्वतःच्या संरक्षणासाठी व व्यवस्थेसाठी निर्माण केली आहे. ५० वर्षापूर्वी बॅरिस्टर चंपतरॉय यानी 'जैन लॉ' नावाचे पुस्तक आंग्ल भाषेत लिहून जैनकायदा हिंदू कयद्यापेक्षा स्वतंत्र असल्याचे स्पष्ट केले आहे. दारुबंदी कायदा राज्यानी अलिकडे त्याचे दुष्परिणाम जाणवू लागल्याने केला परंतु जैनधर्माने फार प्राचीनकाळी दारुबंदी कायद्याचा आपल्या आचारसंहितेत समावेश केलेला होता. जैन कायदा आचारसंहितेवर आधारलेला असून ती आचारसंहिता स्वतंत्र आहे. जैनकायद्याचे रचयिता अदिभगवंताचे सुपुत्र भरतचक्रवर्ती हे होते. भद्रबाहूसंहित हा ग्रंथ श्री. भद्रबाहु श्रुतकेवली यांच्या वेळचा आहे. याला २३०० वर्षे होऊन गेली. याचरुनच जैनकाद्याची प्राचीनता स्पष्ट होते. अर्हन्नीति, वर्धमाननीति, इंद्रनंदी जिनसंहिता, अदिपुराण इ. प्राचीन जैन कायद्याचे ग्रंथ आहेत. समाजाच्या स्थैर्यासाठी व त्यांना चतु:पुरुषार्थाची साधना नीट करता यावी म्हणून जैनकायदा प्रस्थापित झाला. कुटुंब, पुत्रधिकार, विवाह, पैतृकसंपत्ति, संपत्तीचे विभाजन,

उत्तरदायित्त्वाचे किंवा दायभागाचे अधिकार, स्त्रीधन, पालनपोषणाचे अधिकार, चालिरीती इ. विविध विषयांचा संगोपांग विचार त्यांत केलेला आहे. जैनकायदा हा सर्वांग परिपूर्ण आहे. स्त्री-पुरूष समान हक्काचा कायदा भ. वृषभदेवानी हजारो वर्षापूर्वी सर्वजीव समान आहेत, उच्चनीच कोणी नाहीत अशा तत्वरुपाने सांगितला आहे. यावरुन जैनकायदा अति विस्तृत, प्राचीन व स्वतंत्र असल्याची प्रचीति येते. आधुनिक कायद्याचे मूळ जैन कायद्याकडेच ओघाने जाते. यासाठी आधुनिक कायदेपंडितानी जैन कायद्याचा अभ्यास करुन त्यातील अमोलिक कायद्याचा समाजाला उपयोग करुन देण्याची गरज आहे. संशोधन, अभ्यास केल्यास अनेक महान, अलौकिक, कायद्याचे ज्ञान निश्चितच होईल. जैन कायद्यानुसार पतीच्या मृत्यूनंतर विधवा स्त्रीलाच संपत्तीचा पूर्ण अधिकार होता तर हिंदू कायद्यानुसार तिच्या जीवनापर्यंतरच हा आधिकार आहे. तसेच स्त्रियांच्या अधिकारासंबंधी जैन व हिंदू आचार, विचार व कायदा यामध्ये एक विशाल अंतर अहे. इ. अनेक उदाहरणावरुन जैन कायदा हा स्वतंत्र आहे याची स्पष्टता होते. नवयुवक कायदे पंडितानी जैन कायद्याचा समग्र अभ्यास करुन त्याची स्वतंत्रता, उपयुक्तता समाजाला, जगाला पटवून देण्याचे महान कार्य करावे हेच अवहान आहे.

**अर्ध्य ७ वा : जैन तत्वज्ञान-**

आधुनिक विज्ञानाची प्रगति नेत्रदीपक आणि आर्श्चकारक आहे. परंतु ती जैन धर्माशी किती निगडित आहे हे ६ व्या 'अर्ध्यातून' लक्षात घेतले.

संपूर्ण वैज्ञानिक छोटया-मोठया शोधाचा भरीव पाया मात्र जैन तत्वज्ञान आहे हे परमसत्य सर्वाशाने प्रायोगिक अवस्थांच्या विकासातून सिध्द होत आहे. म्हणूनच या 'पूणार्ध्य'तून जैनतत्वज्ञानाच्या सुगंधी धूपाचापरिमल मंगलदायी 'वरदान'ठरलेला आहे. त्रैलोक्यात सार-भूत 'चीजवस्तू' कोणती? वीतराग-विज्ञानता हेच या प्रश्नाचे अचूक उत्तर. जैन तत्वज्ञानाची विशाल 'सरिता' वीतराग-विज्ञानतेपासून उगम पावली आहे.

या 'तत्वज्ञानाच्या नेत्रांजन-शलाकानी' आधुनिक जीवन दृष्टीकोण अधिक निकोप, सुदृढ आणि तेज:पुंज झाल्याचे आढळून येईल.

पाश्चात्य आणि पौर्वात्य संघर्षातून-त्रिकालाबाधित, निरपेक्ष-स्वतंत्र जे सिध्दांत शाबूत, अखंड राहिलेले आहेत तेच जैन-तत्वज्ञान तलस्पर्शीसिध्द झाले. संधर्षातील असंख्य मूल-भूत अथवा स्थूल, सर्वच समस्यांचे कितीही मजबूत दिसणारे 'ताले' एका 'स्याद्‌वाद' अर्थात अनेकान्तात्मक शैलीच्या मास्टर चावीने क्षणार्धातच खुलतात ! आणि मग सहज- सुंदर-अकृत्रिम वस्तुजाताचे भांडार नजरेत भरुन जाते. याच ग्रंथातून स्याद्वादाची महती-पहा किती समर्पक शब्दातून व्यक्त केली आहे.

" स्याद्‌वादाने जीवनाच्या प्रत्येक उपलब्धीला त्यात लपलेल्या सापेक्षतेची किंमत करुन तिचा स्वीकार केला आहे. सर्व निष्पत्तीना एका युक्तिसंगत सूत्रात ओवले, एका बौध्दिक संस्थनेत ओतून अनेकान्तवादी तत्वज्ञानाच्या मुशीतून आकार दिला--------- विश्वाच्या संरचनेच्या मूळ प्रमाणात शिरुन त्याच्या अंग उपांगाना जिवन्त केले. त्याचप्रमाणे जैनधर्म पूर्णपणे पारलैकिक किंवा इहलौकिक झाला नाही. तो आस्तिक अथवा नास्तिकही झाला नाही. तो स्वैराचारीही झाला नाही- किंवा अत्यंत कर्मकाण्डीही बनला नाही. तो पूर्णपणे अरण्यावासी झाला नाही किंवा नगरवासी झाला नाही. ईश्वरवादी किंवा निरीश्वरवादीहि बनला नाही. सगळया अतीत सिध्दांताचे रक्षण करीत त्याने व्यवहारवादीची निर्मिती केली. जो वाद सापेक्ष दृष्टीने 'सगळे काही' होता परन्तु निरपेक्ष अथवा एकांत दृष्टीने काहीच नव्हता-त्याने समग्र जीवनाला पाहिले--------सगळया विरोधी जोडयाच सापेक्षवादाने एकसूत्रतेचा सूर लावता येईल." स्याद्‌वादाचे वास्तववादी विचारसणीचे सुरेख आणि हृदयंगम शब्दांकन या खेरीज अन्यत्र-मराठी-मायबोलीतून तरी विरळा दिसून येईल. (पान ५४७)

भौतिक पध्दतीनक वा आध्यात्मिक पध्दतीने प्राप्त झालेल्या सर्व ज्ञान-विज्ञानाची आधारशिला जैन तत्वज्ञान आहे. येथे कोणत्याही गुणात्मक शाश्वत मूल्यांचा विरोध नाही. जैन तत्वज्ञानाचा 'प्राण'अहिंसा आहे. अहिंसा-तत्वाबरोबर जैन तत्वज्ञान असे समीकरण आहे. ही 'अहिंसा' नकारात्माकच नाही. जीवाच्या चेतन्य सद्‌भावनाशी निगडीत आहे. चैतन्यमय आत्याचया अनुभूतीमध्येच नकारात्क •हिंसा न करणे•

अहिंसेचे स्वरुप सामावून गेलेले आहे. म्हणूनच (स्याद्‌वाद) अनेकान्त, अहिंसा, अपरिग्रह--------यांच्या ‘अ’बीजाक्षरी मंत्राच्चाराने तत्वज्ञानाच्या लेखाना प्रारंभ केला आहे.

जैन तत्वज्ञानाच्या स्वच्छ आरशांतच विश्वाच्या वस्तु-व्यवस्थेचे ठळक प्रतिबिंब उमटले आहे. सर्व आपत्तींचा समूळ नाश होऊन येथे सर्वांचा मंगल-उदय झालेला आहे. म्हणून जैन तत्वज्ञान सर्वोदय-तीर्थ म्हणून प्रसिध्द आहे. वस्तु-व्यवस्थेचे बुनियादी पायाभूत मूल सिध्दांत जैन तत्वज्ञानातून प्रतिपादिले गेले.

प्रत्येक वस्तु स्वतःसिध्द आहे त्याआर्थी अनादि अनिधन, स्वसाहाय, निर्विकल्प-अखंड अद्वैत आहे. ‘सत्’ - कोणत्या ना कोणत्या स्वरुपाने ‘अस्तित्व’ कायम राहणे- हे सत्-मात्र वस्तूचे मूळ लक्षण. सत्-उत्पाद-व्यय-ध्रुव अंशत्रयानी युक्त आहे. ध्रुवांश-द्रव्यात्मक-गुणात्मक शाश्वत आहे. उत्पाद-व्यय हे अंश-पर्यासात्मक, अशाश्वत, परिणमनशील आहेत. असत् चा ‘उत्पाद’ नाही. सत् चा नाश नाही. ध्रुवरुपाने अस्तित्व टिकवून परिणमन शील असे ‘आम्रेडिन’ वस्तुस्वरुपच आहे. परिणमन वसतूचया स्वभावभूत शक्तीने होते. अन्य द्रव्य निरपेक्ष असे अव्याहत कार्य परिणमनाचे स्वयंचलित यंत्राप्रमाणे चालू असताना- त्यामागे कोणत्याही ‘सूत्रधारा’ ची गरजच नाही- हा मूळ सिध्दांत परिणमन वसतूमधून, वस्तूमध्येच होत राहते. समुद्राप्रमाणे वस्तुपूर्ण स्वयंसिध्द आहे. लाटांचे उसळणे- वा विरुन जाणे-----यामुळे समुद्राच्या पूर्णत्वाला बाधा पोहचत नाही. वस्तू अनंतधर्मात्मक आहे. निरुपण करताना स्याद्वाद-नयात्मक शैलीचे अवलंबन घ्यावेच लागते. व्यवहारातील साध्या ताक घुसळणाऱ्या गवळणीचे उदाहरण अत्यंत समर्पक आणि बोधप्रद आहे. रवीने मंथन करताना गवळण दोन्ही-दोरीचे पदर एकाच वेळी ओढून धरत नाही. अथवा दोन्ही सैल सोडत नाही. कारण तसे केल्यास घुसळण होत नाही ‘ लोणी’वर तरंगणार नाही. गवळणीला दोन्ही पदर हाती तर धरावेच लागतात एक पदर ‘सैल’व एक पदर ओढून- अशी क्रिया होतानाच मंथनातून ‘नवनीत’ निघते. अनेकान्तात्मक वस्तु निरुपण करताना द्रव्य-पर्याय, निश्चय-व्यवहार इ. उभय नयांचे पदर हाती धरून एक गौठा-एक मुख्य केले तर इष्ठ प्राप्तीचे सुखशांतीचे नवनीत मिळाल्या खेरीज राहणार नाही.

याकरिता जैनतत्वज्ञानाची उकल करताना अनुषंगाने आभासात्मक-तत्वज्ञानाची ओळख नाईलाजाने करुन द्यावी लागली आहे. वस्तु-व्यवस्थेच्या कसोटीवर उतरेल ते सारे तत्वज्ञान त्या वस्तूचे स्वतःचे असते. तेच ‘निरतत्व’ जिनांनी प्रतिपादन केले. जिनांचे म्हणून ‘जन’ आम्ही उपचाराने म्हणू लागलो. वासतविक ‘निज’ ते ‘जिन’ वर्णविर्यासी रुप आहे.

‘जिन’ जैनाचा म्हणून अनुराग नाही. इतराबद्दल द्वेषही नाही. युक्ति आगम तर्क-संगत जे कथन ते स्वीकारार्ह ठरेल. परीक्षा प्रधानी, निष्णात-तज्ञ अशा वैज्ञानिकानी (सर्वज्ञानी) काढलेले हे वस्तु-व्यवस्थेतील अंतिम ‘निष्कर्ष’ त्रिकालाबाधित आहेत.

वीतराग-विज्ञानतेचा महान् आदर्श आणि संपूर्ण जैनतत्वज्ञानाचे प्रतिक-अरिहन्तादि पंचपरमेष्ठींचा णमोकार मंत्रातून व्यक्त झाला आहे. त्या मंत्राच्या निनादाचा अर्थ-बोध हा आहे की विश्वातील विराट् महासत्तेचे प्रावरण उघडताच-षड्‌द्रव्यात्मक वस्तुजाताचे दर्शन होते.

पुद्‌गल-धर्म-अधर्म-आकाश-काल-जडात्मक } विश्वात
जीव (अनंतानंत जीवसृष्टी)-चेतन }

माझे ‘अस्तित्व’ कोठे व कसे आहे- ते किती काळाचे आहे- त्या संबंधाची जिज्ञासा-तृप्तीचा उपाय म्हणजे या ६ द्रव्यांचा परिचय करुन धेणे. विश्वात माझ्यासह ही द्रव्ये अनादि-अनिधन आहेत. हे ‘गुढ’ जैन तत्वज्ञानानेच सांगितले .

षड्‌द्रव्य, नव पदार्थ, सात तत्व, प्रमाण, नय, निक्षेप, यांचा सविस्तर तपशीलच या ग्रंथातून दिसणार नाही. तपशीलातून जाताना ‘अचूक’ आपण काय खरेदी करणार त्या ज्ञाता-दृष्टा जीव स्वभावाच्या

अंगणात पोचविण्याचे काम येथे चोख झाले आहे. ज्ञेय-हेय-उपादेय तत्वांची खूणगाठ बांधून देत देत आत्यंतिक सौख्यवान् आत्मतत्वाची 'संवेदना' अनुभवण्या इतपत स्पष्ठ प्रकाश या तत्वज्ञानाच्या दालनातून ठायी ठायी पडलेला आहे. अचेतन आणि अन्य सारे जीव ज्ञेय-तत्व आहेत. ती 'निशाणी' 'माईलस्टोन' अथवा मार्किंग-बोर्ड-प्रमाणे समोरुन जाते. धोक्याचया लाल-कंदिलाचे काम 'हेयतत्व' अर्थात् आस्त्रवादि-बहिस्तत्व करुन देतात आणि 'सिग्नल' दाखविणारे उपदेय तत्व-चैतन्य, 'जीवाची परिणती' अथवा शुध्दोपयोगी आत्मा हे आहे.

हे समजून येण्यासाठी बराच पसारा वाढवावा लागला. लोकरचना, जैनदर्शन व तत्वसिध्दांत, कर्मवाद, समतावाद, वस्तू स्वातंत्रवाद-पारमेश्वरी पदार्थ रचना- या सूक्ष्म चर्चेने द्रव्य-गुण-पर्यायात्मक अखंड वस्तु-तत्वाची ओळख होत गेली. आत्माच्या ४७ शक्तीनी आत्मवैभाची महिमा कळली व ४७ नयाच्य द्वारे व्यवहार व निश्चयनयाने आत्मा ओळखला गेला. कार्यकारणभावाशी जैनदर्शनाचा संबंध-संसारी विभावावस्थेतून आणि मुक्त स्वभावावस्थेतून कसा जाणावा याचे अचूक दर्शन-होऊन समीचीन-तीक्ष्णबुध्दीची प्रचिति या तत्वज्ञानामुळे येईल.

प्रत्येक जीवमात्रात द्रव्यगत शक्ति 'ईश्वरी' पूर्णतया आहे. बहिरात्मपण टाकून अंतरात्मा-साधकत्वाचा वेष धालून परमात्मपदी प्रत्येक जीव विराजमान होतो. अशी परमेश्वर शक्तीची 'किमया' जैन तत्वज्ञानाशिवाय अन्यत्र लाभूच शकत नाही.

स्वात्मोपलब्ध्दि झालेला जीव प्रथम 'आत्मज्ञ सिध्द ' आहे, पर्यायातील सिध्दत्व त्याचेच प्रकटते. या दृष्टीने आधी 'आत्मज्ञत्व' होऊन स्थिरावण्यासाठी प्रयत्न हवा. 'सर्वज्ञत्वा' वर दृष्टी खिळविण्याचे कारण नाही. ते सहज निश्चित आत्मज्ञ होऊन राहताच (भूत्वा-भवन) लाभणारच आहे. आत्मज्ञत्व अंतरंग गाभा तर सर्वज्ञत्व त्याबरोबरच नियत असलेले बहिरंग वैभव आहे. म्हणून वस्तुनिष्ठतेच्या अत्यंत जवहीकतेने नांदलेले हे 'जैन दर्शन' अनुपम आहे. जैन न्यायाचे समीक्षणात्मक शैलीने अध्ययनपूर्ण विवेचन यात करावे लागले ते जैन दर्शनाचे अंतरंगातून आरपार जाण्यासाठीच.

विकासाच्या पायऱ्या स्वरुपी श्रावकधर्माचे निरुपणही अंतरंग उजळून दाखवित आहे. श्रावक वा मुनि दोधांनी करावयाचे 'आचार' शारीरिक आरोग्याचे सन्तुलन दाखविणारे हे सिध्द केले आहे. या दृष्टीने आचाराची बाहय वस्त्रे द्रव्य-क्षेत्र-कालमानाने बदलली तरी मोह-क्षोभरहित साम्य धर्माचे रुप त्रिकालाबाधीत रहाते. हे जैन आचारधर्मातून पाहणे आवश्यक आहे. निव्वळ 'आचार' म्हणजे चारित्र्य नाही. स्याद्वाद अनंकातवादात्मक दृष्टी, सप्तभंगी, नयात्मकता, प्रमाणात्मक दृष्टी या प्रकारांची गरज मोक्षमार्गाप्रत भावावस्थेने पोहचण्यासाठीच आहे. अन्यथा शब्दजंजालाच्या 'अडगळी' संघर्ष करतात. हे या तत्वज्ञानाच्या दालनातून चांगलेच कळून येईल.

स्थूलातून सूक्ष्माकडे, परिचितापासून अपरिचित-मोक्षावस्थाकडे जाण्यासाठी हा विविध विषयांचा प्रपंच मांडला. जैन तत्वज्ञानातील परिभाषीक संज्ञा, गुणस्थान, मार्गणा, ध्यान, आत्मसाधना, सल्लेखला या पैलूंचे सूक्ष्मातिसूक्ष्म वस्मुनिष्टपणे दर्शन तत्वाज्ञानाच्या प्रवेशद्वारातून जाताना होत आहे. आध्यात्मिक दृष्टीच्या राजमार्गावरुन कधी जात असल्याचा निर्भेळ आनंद आहे तसाच आगम दृष्टीच्या खाचा खळग्यांचे धोके दाखवून त्यातूनही खंत, भेद, विषाद वाटू न देता एकाच ठिकाणी स्वात्मोपलब्ध्दिस्वरूप सिध्दीची वाटचाल संपणारी आहे. आमगदृष्टीचे दीपस्तम्भ संकटाना घाबरुन धैर्य गळू देत नाहीत. आध्यात्मिक दृष्टीचे 'सिग्नल' लक्षबिंदू दृष्टीआड होऊ देत नाही. आत्मविश्वासपूर्ण उस्ताहाने सहज वाटचाल कोणतसाही मुमुक्षु पिपासूला करता येईल. अशी ग्वाही 'तत्वज्ञान' या अर्ध्याने दिली आहे.

या पूर्णार्ध्यात तत्वज्ञानाचे दालन अत्यंत महत्वाचे आहे. ते जर वगळले असते तर अपूर्ण सुख समाधान वाटयाला आले असते. कारण 'तत्वज्ञानविहिनानां दुःखमेव हि शाश्वतम्' अशी वादीभसिंहसूरींची

गर्जना आहे ती वास्तविक आहे. कारण या संसारात दु:ख पर्वतप्राय आणि सुख जवा एवढे असा प्रत्येकाचा अनुभवाचा दाखला आहे.

आपार असा दु:खाने भरलेला परावार आहे. त्याला पार येईल, अंत होईल तर तत्वज्ञानामुळेच ! सुक्तीकारानी म्हणून तर निर्वाळा देऊन विचारले आहे- शुष्के नीरे क: कासार:/ ज्ञाते तत्वे क: संसार ? अर्थात् संसाराच्या तळयातील मृगजळ म्हणजेच वस्तुस्वरुपाची भ्रांति. हा भ्रम वस्तूच्या स्वरुप-कारण आणि भेदाभेद-विपर्यासाचे अनिष्ठ फल आहे. वस्तुतत्वाचे ज्ञान होताच जणू काही अथांग-भयप्रद-सागरातील पाणी सुध्दा मुखातील चूळभर पाण्याएवढे होते. म्हणजेच निर्भेळ, वस्तुनिष्ठ जैन तत्वज्ञानामुळे संसारातील कोणतेही 'दु:ख' जीव सहज लीलया झेलू शकतो ! मात्र ज्ञान सुखस्वरुपी चैतन्य सुखाचा आस्वाद घेतो.

**अर्ध्य ८ वा : तुलनात्मक-चिंतन समतोल तत्वदर्शन-**

जगातील सर्व एकांतवादीची संख्या एकूण ३६३ मते आहेत, तथापि न्यायशास्त्रामध्ये कांही प्रमुख एकांतवादाचा खंडन-मंडनरुप उहापोह आढळून येतो.

१) सांख्यांचा नित्यवाद, २) बौध्दांचा क्षणिकवाद, ३) नैययिकांचा समवाय वाद, ४) वैशेषिकांचा विशेषवाद, ५) वेदान्ताचा ब्रह्माद्वैतवाद, ६) ईश्वरवादींचा ईश्वर सृष्टिकर्तृत्ववाद, ७) चार्वाकांचा निरीश्वरवाद-वेदप्रमाण वाद, ८) सौगतांचा अन्यापोहवाद, ९) शूनयवादींचा शून्य वाद इ. असे जगामध्ये अनेकपंथ-अनेकवाद प्रचलित आहेत. प्रत्येक पख आपला पक्ष खरा व दुऱ्याला पक्ष खोटा असे मानतो. त्यामुळे परज्ञपरामध्ये संघर्ष निर्माण होत आहे. प्रत्येकाला वस्तूमध्ये दुसरा प्रतिपक्ष धर्म दिसत नाही असेही नाही. तथापि एकाच वस्तूमध्ये सत्-असत्, नित्य-अनित्य, एक-अनेक, तत्-अतत् इत्यादि असे परस्परविराधी धर्म युगपत् कसे राहतात हा गूढ कूठ प्रश्न कोणालाच उमगला नाही. त्यामुळे त्यानी आपपल्या बुध्दीप्रमाणे त्यातील कोणताही एक धर्म परमार्थसत् मानून दुसरा विरोधी धर्म अपरमार्थ-असत्-संवृति-मायारुप आहे असे मानून आपापल्या पक्षाचे परमार्थत्व सिध्द करण्याचा प्रयत्न केला आहे.

परंतू वस्तुनिष्ठ जैनशासनाने वसतूमध्ये प्रतयक्ष प्रतीत होणारे हे परस्परविराधी धर्म **भिन्न भिन्न विवक्षेने** एकाच वसतूमध्ये गुण्यागोविंदाने-परस्पर सापेक्षभावाने-अविरोधपणाने राहू शकतात हे अनेकांतवादाचे गूढ रहस्य ओळखून जगातील सर्व एकांतवादाना एकाच मंचावर आणण्याचा पक्षातीत होऊन प्रयत्न केला आहे. त्यामुळे वस्तुनिष्ठ अनेकान्त जैनशासन हा सार्वधर्म- सर्वोदयतीर्थ ठरत आहे. वस्तुनिष्ठ अनेकांतवादाचे रहसय न समजल्यामुळे काही शंकराचार्यादिक अजैन विद्वानानी-जैनधर्माचा अनेकांतवाद हा संशयवाद आहे, अनिश्चयवाद आहे असे दूषण देण्याचा प्रयत्न केला आहे. 'जीव:अस्ति,नास्ति च ' जीव आहेही व नाहीही, जी वस्तु आहे तीच वस्तू नाही म्हणणे हा परस्पर विरोध आहे असे स्थूलदृष्टी माणसाला वाटणे साहजिक आहे.

परंतू सूक्ष्मदृष्टी - नि:पक्षपाती कै.डॉ. भांडारकर- जर्मन डॉक्टर जकोबी, डॉ. राधाकृष्णन् आदि काही अनेकांत मर्मज्ञ विद्वानानी जैनधर्माच्या अनेकांतवादाची मुक्त कंठाने स्तुति केली आहे.

जीव जीवरुपाने आहे व अजीवरुपाने नाही. अर्थात् जीव जीव आहे अजीव नाही हे एवढे सरळ सोपे अनेकांताचे वस्तुनिष्ठ मर्म जैनशासनाने जगास दाखवून सर्व पक्षांना रएका पक्षातीत सर्वोदय तीर्थात आणण्याचा प्रयत्न केला आहे हे जैनशासनाचे वैशिष्टय आहे.

**१. ब्रह्माद्वैतवाद**

ब्रह्माद्वैतवादी द्वैतनिरपेक्ष एक अद्वैत ब्रह्माची सिध्दि करु पाहतात. पण अद्वैत हा शब्दच द्वैतसापेक्ष आहे. 'न द्वैतं अद्वैतं ' जगामध्ये द्वैत नामक ब्राह्माशिवाय वेगळी वस्तु आहे. तिचा ब्रह्मामध्ये अभाव आहे याला खरा ब्रह्माद्वैतवाद म्हणतात.

प्रत्येक वस्तू ही अद्वैत आहे. एका वस्तूचा दुसऱ्या वस्तूमध्ये अत्यंत अभाव आहे. प्रत्येक वस्तु स्वतंत्र आहे, स्वाधीन आहे. परतंत्र-पराधीन-अन्य ईश्वराधीन नाही. प्रत्येक वस्तूचे परिणमन आपल्या शक्तिसामर्थ्याने अखंड स्वद्रव्य-क्षेत्र-काल-भावामध्ये होते. अन्य द्रव्य त्यामध्ये किंचित्‌ही ढवळाढवळ करु शकत नाही.

ब्रह्माद्वैतचा दुसरा अर्थ 'एक महासत् ' सर्व पदार्थामध्ये व्यापक राहणारा जो समान अस्तित्वधर्म त्याला येथे एक महासत् म्हटले आहे. हे एक महासत् अनेक अवांतरसत् (व्यक्तिसत्) मध्ये राहणारे जातिसामान्य सत् आहे. त्याला एक ब्रह्मासत् म्हटले आहे. सर्व पदार्थांना समान अस्तिधर्मरुपाने पाहण्याची ही एक विशाल उच्च पातळी आहे. येथे जीव-अजीव, चेतन-अचेतन ही देखील भेद बुध्दि नाही. प्रत्येक पदार्थ मग तो चेतनपदार्थ असो की अचेतनपदार्थ प्रत्येकाला अस्तिरुपाने राहण्याचा स्वतंत्र अधिकार आहे. अचेतन वस्तू चेतन वस्तूच्या आधारावर नाही. चेतन वस्तू अचेतन वस्तूच्या आधारावर नाही. प्रत्येक वस्तू अख्ंड-स्वयंपूर्ण आहे. हा ब्रह्माद्वैतवादाचा खरा अर्थ आहे.

## २. सृष्टिकर्तृत्ववाद

ईश्वरवादी जगाला पराधीन, ईश्वराधीन मानतात. ईश्वराला सृष्टीचा कर्ता मानतात. मनुष्यप्राणी स्वत:च्या सुख दु:खाविषयी पराधीन आहे. अज्ञ-अनीश्वर आहे. ईश्वराच्या प्रेरणेने तो स्वर्ग किंवा नरकाला जातो. पुण्यवान् माणसाला ईश्वर स्वर्गात ठेवतो. पापी मनुष्याला नरकात टाकतो. सृष्टीची उत्पत्ति-लय हे सर्व ईश्वराच्या अधीन आहे.

परंतू वास्तविक ईश्वर जर या जगाच्या भानगडी करीत राहील तर त्याचे ईश्वरत्वच नष्ट होईल. वास्तविक प्रत्येक जीव, प्रत्येक वस्तू ईश्वर आहे. ती आपली पर्यायसृष्टी रचण्यास स्वत: समर्थ आहे. पराधीन-परतंत्र-अन्य ईश्वराधीन नाही. हा खरा सृष्टिकर्तृत्ववाद आहे.

## ३. कूटस्थ नित्यवाद

सांख्य वस्तूला कूटस्थ नित्य अपरिणामी मानतात. वस्तूच्या आकारामध्ये जो बदल होतो तो वस्तूचा केवळ अविर्भाव-तिरोभाव आहे. समुद्रामध्ये तरंग उठतात, पुन: विलीन होतात. समुद्र जेवढाचा तेवढाच राहतो. त्यात काहीच बदल होत नाही. तसे वस्तूमध्ये पर्याय तावत्काल अविर्भूत होतात. पुन: ते वस्तूमध्येच तिरोभूत होतात. वस्तू जेवढीची तेवढीच राहते. त्यात काहीही स्थित्यंतर होत नाही. हे त्यांचे म्हणणे वस्तु दृष्टीने युक्तियुक्त वाटते. पण जो वस्तूच्या आकारामध्ये अविर्भाव निरोभाव होतो तो आकार कोणाचा ! तो आकार त्या वस्तूचाच, वस्तुच स्वत: आकाररुपाने अविर्भूत होते व निरोभूत होते. म्हणून वस्तूला सर्वथा अपरिणामी कटूस्थ मानणे युक्तिसंगत सिध्द होत नाही. जी वस्तू कूटस्थ अपरिणामी आहे, ज्या वस्तूमध्ये काहीच परिणमन होत नाही ती वस्तु अर्थक्रियाकारी- उपयोगी ठरत नाही. तिचे अस्तित्व असून-नसून सारखेच. परिणमनशील वस्तूच अर्थक्रियाकारी-सार्थक-उपयोगी सिध्द होऊ शकते. अपरिणामी हा निषेधसूचक शब्दच आपला प्रतिपक्षी धर्म परिणामित्व याचा अविनाभाव सिध्द करतो. पर्यायरुप परिणमनामध्येच द्रव्याचा अपरिणामीपणा राहू शकतो. वस्तूमध्ये परिणामित्व-अपरिणामित्व हे परस्पर विरोधी धर्म युगपत् अविनाभावरुपाने राहतात. सूर्य उदयास येतो व अस्तास जातो तेव्हाच तो जगाच्या उपयोगी पडू शकतो.

## ४. बौध्दांचा क्षणिकवाद

बौध्द प्रत्येक वस्तूचे अस्तित्व एक क्षण-क्षणरुप मानतात. प्रत्येक समयाला वस्तु निरन्वय उत्पन्न होते व दुसऱ्या समाजाला निरन्वय नष्ट होते. अनेक क्षणामध्ये जो संस्काररुप एक अन्वय दिसून येतो तो परामर्थ नसून ते संवृतिसत् आहे, तो भ्रम आहे असे बौध्द मानतात.

परंतु त्या अनेक क्षणामध्ये पर्वापार जो विशिष्ट कार्य-कारण भाव आहे तो वस्तूमध्ये अन्वयधर्म परामार्थसत्य मानल्याशिवाय सिध्द होणार नाही. चित्तक्षण (ज्ञानक्षण) व चेत्यक्षण (ज्ञेयक्षण) यामध्ये आपापला अन्वयधर्म मानला नाही तर चित्तलक्षणापासून चेत्यक्षणाची उत्पत्ति व चेत्यलक्षणापासून चित्तक्षणाची उत्पत्ति मानण्याचा अनिष्ट प्रसंग येईल.

यावरुन अनेक क्षणामध्ये जसा क्षणिकपणा परामार्थ सत्य आहे तसा अन्वयधर्म नित्यपणा देखील परामर्थसत्य मानणे आवश्यक आहे.

याप्रमाणे अनेक उदाहरणावरुन हे सिध्द होते की प्रत्येक एकांतवादीनी मानलेले एकांतधर्म वस्तूमध्ये वस्तूनिष्ठ अवश्य आहेत. वस्तूमध्ये नसणारे धर्म त्यानी मानले असा त्याचा अर्थ नाही. पण त्यानी मानलेला धर्मच वस्तूमध्ये सर्वथा परमार्थ सत्य आहे व दुसरा प्रतिपक्षी धर्म वस्मूमध्ये परमार्थ सत्य त्यानी मानला नाही. या हठाग्रहानेच ते वस्तुनिष्ठ तत्वज्ञानापासुन घसरले- दूर गेले. त्यानी स्वीकारलेला पक्ष हा पक्षपात ठरला. महणून ते सर्व एकांतवाद मिथ्या ठरले. त्यांच्यामध्ये परस्पर संधर्ष-उत्पन्न झाला. ते सर्व एकांतवाद अशांतील कारण ठरले.

याचे उलट त्या सर्व एकांतवादाचा आपापल्या विवक्षेने वस्तुनिष्ठ परामाथ्रसत्य मानून सर्वांचा एकच समन्वय सांधून सर्वाना एका सर्वोदयतीर्थात-एकमंचावर-स्थापन करणारा वास्तववादी वस्तुनिष्ठ अनेकांतवाद समतोल तत्वदर्शन हें विवेकी सर्व लोंकांच्या आदरास पात्र ठरेल.

**अर्ध्य ९ वा : जैन सामाजिक जीवन-**

जैन महिला जीवन - स्त्री-पुरुष ही विश्वरथाची दोन चाके असल्याने विश्वरचनेत स्त्रीचे स्थान पुरुषाप्रमाणेच सहज, स्वाभाविक, अनिवार्य व अभिन्न आहे. विश्व इतिहासाला गतिमान करण्याचे महान कार्य पुरुषाप्रमाणे स्त्रीनें देखील केलेले आहे. ऐतिहासिक काळात विश्वाला, युगाला अखिल मानवजातीला नवीन प्रेरणा देऊन गतिमान बनविण्याचे कार्य जैन स्त्रीने केल्याची साक्ष इतिहासाची असंख्य पाने देत आहेत. २० व्या शतकात मानवी जीवनाच्या समाजरचनेत सामाजिक गतिमानतेच्या, सामाजिक प्रबोधन व संक्रमणाच्या प्रक्रियेत जैन महिलाचे आदराचे, मानाचे, पुरुषासमान स्थान आहे. यामध्ये इतिहास काळात व आधुनिक काळात जैन महिलानी केलेल्या असामान्य कार्याचा, वीरांगनानी दाखविलेल्या शैार्याचा,आदर्शाचा समाजजीवनातील जैन स्त्रीचे महत्वाचे स्थान, तिच्याकडे पहाण्याचा समाजाचा दृष्टीकोन इ. चा समग्रपणे उल्लेख केला आहे. उच्च विद्याविभूषित शीलवान जैन स्त्रियांची परंपरा संस्कृतीच्या प्रारंभकाळापासून झाली हे ब्राह्मी व सुंदरी यांच्या उदाहरणावरुन स्पष्ट होते. शिक्षणात, धर्मकार्यात, समाजकार्यात प्राचीन काळापासून स्त्री अग्रेसर होती. आजच्या आधुनिक युगात स्त्री ही कांही क्षेत्रात पुरुषापेक्षाही अधिक बलवान झाली आहे. समाजाचा जो गैरसमज की स्त्री ही अबला आहे, त्याचे उत्तर स्त्रीसुध्दा कोणत्याही क्षेत्रात मागे नाही उलट अग्रेसर असल्याचे प्राचीन काळी व आधुनिक काळात देखील उदाहरणाने व कृतीने सिध्द करुन दाखविले आहे. स्त्री ही सर्व मानवाची जगन्माता आहे. तिचे स्थान फार उच्च आहे. प्राचिनकाळापासून जैन महिला शिक्षण, कला, समाजजीवन, क्षेत्र, धर्म, युध्द इ. विविध क्षेत्रात निपूण, अग्रेसर होत्या हे इतिहासाच स्पष्ट सांगतो आहे. आधुनिक युगात तर एकही विभाग असा नाही की तेथे स्त्रीचा अभाव आहे. सर्व क्षेत्रात स्त्रिया अग्रेसर आहेत प्राचीनकाळी स्त्रिया युध्दनीति, राजनीति, समाज व धर्मनीतीमध्ये अग्रेसर होत्या. स्त्रीला प्राचीनकाळापासून समान अधिकार होता. आजन्म अविवाहित राहून समाजसेवा व आत्मकल्याण करणाऱ्या स्त्रियांची अनेक उदाहरणे आपण प्रत्यक्ष पहातोच आहोत. सेवाकार्यात स्त्री हीच सर्वश्रेष्ठ ठरलेली आहे हे इतिहासासिध्दच आहे. गृहस्थधर्मातील स्त्रीचे पतिनिष्ठा, पावित्र्य, सहनशीलता, वात्सल्य, समता हे महत्वाचे कर्तव्य आहे हे अंजनासुंदरी, सीतादेवी इ. उदाहरणावरुन स्पष्ट होते. प्राचीनकाळी जैन स्त्रिया विदुषी, धर्मात्मा, कर्तव्यपरायण, निर्भय, वीरांगना, पतिव्रता, समाजसेविका असल्याची अनेक उदाहरणे आढळतात. समाजाला सुसंस्कारित, सुशिक्षित करण्याचे महान कार्य स्त्रीचे करीत आहे. जैन महिला थोर लेखिका, कवयित्री, कलाकार, चित्रकार होत्या व आहेत. प्राचिनकाळापासून स्त्री ही

विश्वाची जननी असल्याचे आधुनिक युगापर्यंत जगाने मान्य केलेले आहे. प्राचीनकाळापासून जैन महिलानी राजकारण, समाजकारण, धर्मकारण, कला, साहित्य, विज्ञान इ. जीवनाच्या विविध क्षेत्रात महत्वाचे व मानाचे स्थान मिळाविले, कर्तबगारी दाखविली. आधुनिक काळातील सर्वांगपरिपूर्ण स्त्री हे त्यांच्या प्रयत्नाचेच फळ आहे असे वाटते. जैन महिलामध्ये ब्राह्मी, सुंदरी, चंदनबाला, सीतादेवी, अंजनादेवी, अचला, अमोदिनी, कौशिकी, जीवनंदा, धर्मघोषा, माँ चंदाबाईजी, पूजिता पतीसाबाई, नंदिनी कृष्णा, उज्वलकुमारी, क्षु.त्यागमुर्ती राजुलमती अम्मा इ. अनेक थोर महिला आपल्या दिव्य, सर्वश्रेष्ठ कार्याने जगाला आदर्श व प्रेरणादायी ठरलेल्या आहेत. यावरुन आधुनिक स्त्रियानी आपले सर्व क्षेत्रातील स्थान सर्वोच्च कण्यासाठी थोर महिलांचा आदर्श अनुसरावा.

**सप्तपरमस्थाने-** व्यवहारात ज्याप्रमाणे देहाच्या बालपण, तारुण्य, वार्धक्य या अवस्था आहेत त्याप्रमाणे आत्म्याच्या विकासाची-कल्याणकारी सात परमस्थाने आहेत. तीं येणेप्रमाणे:- सज्जति, सद्गृहस्थत्त्व,परिव्राज्य, सुरेंद्रता, साम्राज्य परमस्थान, अर्हन्त्य परमस्थान, परमनिर्वाणपद या प्रत्येक स्थानातून जात असताना जीवाचा विकास होतो व शेवटी अंतिम ध्येय निर्वाणपद प्रप्ति होते. ही परमस्थाने मोक्षप्राप्ती करुन देतात. म्हणून त्याना परमस्थाने-श्रेष्ठ स्थाने असे म्हटले आहे. यामुळे जीवाला क्रमाक्रमाने मोक्षप्राप्ती होते. यामध्ये द्विज कोणाला म्हणतात. यज्ञोपवीत प्रकार, त्याचे महत्व यांचे समग्रपणे वर्णन केलेले आहे. सज्जाति परमस्थानधारक जीव उत्कृष्ट दिव्यज्ञानरुपी गर्भापासून उत्कृष्ट जन्माला, पदाला पोहोचतो. दुसऱ्या परमस्थानामध्ये श्रावकाच्या षट्क्रिया इ. बाबत वर्णन केलेले आहे. जो जीव आळस सोडून सात क्रियांचे आचरण करतो त्याला परमधामाची प्राप्ति होते व तो उत्कृष्ठ अक्षयसुखात विलीन होतो. या क्रियासहित जिनधर्माचे पालन व स्मरण केल्याने आचरणाने संसारबंधनातून लवकर मुक्तता होत. या सप्त परमस्थानाद्वारे आत्मविकास करता येतो. यामुळे भौतिक सुख तर मिळतेच परंतु क्रमाक्रमाने मोक्षप्राप्ती होते. यामुळे स्वहित व परहितही साधले जाते. यासाठी या सप्तपरमस्थानाची ओळख करुन घेण्याची व आचरण करण्याची नितात गरज आहे. सप्त परमस्थाने मोक्षरुपी दिव्य मंदिराच्या सुवर्ण पायऱ्या आहेत.

**संस्कार विधी व महत्व-**

आदर्श संस्कार हेच आदर्श मानव, समाजाचे, राष्ट्राचे मूळ आहे. संस्कारावरुन मानवाची, समाजाची राष्ट्राची श्रेष्ठता ठरत असते. या बाबतीत जैनांचे स्वतंत्र व कलयाण्कारी संस्कार व विधि आहेत. संस्कार हे जीवनाचे मूळ आहे. हेच खरे शिक्षण. बालकावर, जीवावर तो गर्भात आल्यापासून जैनशास्त्रानुसार संस्कार केल्यास त्या जीवाचे कल्याण होते, जीवन सुखमय होते. त्यासाठी संस्कारविधी समजून घेऊन त्याप्रमाणे संस्कार केल्यास अमूल्य गुणभंडार प्राप्त झाल्याशिवाय राहणार नाही. संस्कारावरुनच संस्कृती ठरत असते. जैनशासनानुसार बालक मातेच्या गर्भात आल्यापासून त्याचा अंत होईपर्यंत संस्कार व विधी समग्रपणे वर्णन केलेला आहे. जानवे धारण करण्याचा विधी, विवाह संस्कार विधी, वाग्दान विधी, प्रदानविधी, पाणिग्रहण विधी इ. संस्कार-विधीचे वर्णन सविस्तरपणे केलेले आहे. हे सर्व विधी संस्कार आचार्य जिनसेनानी आदिपुराणात वर्णन केलेले आहेत. जैन संस्कार व विधीस सर्वोच्च स्थान आहे. जैन संस्कार आगमप्रधान व कल्याणकारी असल्यामुळे सर्वश्रेष्ठ आहेत. जैन संस्कारामुळे आत्मा पवित्र होतो, आत्मशुध्दी होते. जैनांचे संस्कार सर्वोत्तम, उच्च आहेत. त्यामुळे जैनसमाज प्राचीनकाळापासून उच्च, आदर्श ठरला आहे व आधुनिक काळात देखील तो आपल्या थोर संस्कार व संस्कृतीमुळे उच्च आदर्श ठरला आहे. जैनसंस्कृती पवित्र, मंगल सर्वोत्तम असण्याचे महत्वाचे कारण म्हणजे जैनसंस्कारच सर्वोत्तम आहेत. याचा प्रत्येक मानवाने अभ्यास करुन आपल्या स्वतःचे व इतराचं कल्याण करावे. सुसंस्कारोन, समाजाची, राष्ट्राची उन्नती, श्रेष्ठता वाढवावी.

**जैनशिक्षण पध्दती-** मानवी जीवनाची सफलता ज्ञानावरच अवलंबून असते. व्यक्तीचा सर्वांगीण विकास ज्ञानामुळेच होतो. स्वाध्यायाने नराचा नारायण होतो. प्राचीनकाळापासून भारतात अत्यंत सुव्यवस्थित, आदर्श् शिक्षणपध्दति होती. भ. आदिनाथानी आपल्या ब्राह्मी व सुंदरी या दोन कन्याना भाषा-गणिताचे शिक्षण दिले. त्यानिच शिक्षणाची पध्दति सुरु केली. आपल्या भरत बाहुबली इ. मुलाना चौसष्ठ

कलांचे संपूर्ण शिक्षण दिले. तेव्हापासून शिक्षणपध्दतीचा उगम झाला व तो आजतागायत चालू आहे. म्हणून जैनशिक्षण पध्दति सर्वात प्राचिन व सर्व शिक्षणपध्दतीची जननी आहे.

जैनशिक्षण पध्दतीचा प्रमुख हेतू-सदाचाराची वृध्दी, व्यक्तिमत्त्वाचा विकास, प्राचीन संस्कृतीचे रक्षण, सामजिक व धार्मिक कर्तव्याचे शिक्षण, जीवनाचा सर्वांगिण विकास, आतमशुध्दी, आदर्श मानव निर्मिति, स्वकल्याण व राष्ट्रकल्याण, राष्ट्रीयत्व निर्मिति इ. अनेक श्रेष्ठ हेतू आहेत. आजच्या शिक्षणमध्दतीबद्दल अनेक मते मांडली जातात. आजची शिक्षण पध्दति सदोष, जीवनाभिमूख नाही. आजच्या शिक्षणाने संस्कारक्षम मानव व्यक्ति विकास, राष्ट्रभक्ति, विश्वबंधुत्व, क्षमता याची निर्मिति केलेली नाही म्हणून ते अपयशी ठरले.परंतू हजारो वर्षापासून जैनशिक्षण पध्दति निकोप, निर्दोष, जीवनाभिमूख, भौतिक व आध्यात्मिक हित साधणारी, सर्वांगपरिपूर्ण, दिव्यत्वाकडे नेणारी, संस्कारक्षम, विश्वबंधुत्वाची जोपासना व वृध्दी करणारी आहे. यासाठी आधुनिक शिक्षणतज्ञानी जैनशिक्षण पध्दतीचा सूक्ष्म अभ्यास केल्यास सध्या राष्ट्राला भेडसावणारे अति भयंकर बेकारीचे प्रश्न सोडविण्यास फारच मदत होऊन नवसमाज आदर्श सुखसंपन्न होईल. यात तिळमात्रदेखील शंका नाही.

**चातूर्वर्ण्य-** भ. वृषभदेवानी प्राचीनकाली आदर्श समाजरचनेसाठी तीन वर्ण त्यांच्या कार्यावरून तयार केले होते. वर्णपध्दतीमध्ये मानवाच्या कार्यकर्तृत्वाला प्राधान्य दिले होते. कार्यकर्तृत्वावर जैन वर्णव्यवस्था अधिष्ठित होती. क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र हे तीन वर्ण होते. त्याकाळी सर्वच समाज जैन होता. परंतु कालान्तराने भरतचक्रवर्तीनी ब्राह्मणवर्णाची स्थापना दान देण्यास पात्र असलेले ब्राह्मण त्यांच्या कार्यावरुन केली. या चार वर्णाचे अदिपुरणात आचार्य जिनसेनानी समग्रपणे वर्णन केलेले आहे. त्याला अन्य धर्मीयानी कालान्तराने विकृत स्वरुप देऊन समाजात जातीभेद उच्च नीच भेदभाव निर्माण केले. परंतु जैनचार्यानी चार वर्णव्यवस्था व्यक्तीच्या कार्यावरुन ठरवलेली होती. त्यामध्ये सर्वांना समान हक्क होते. उच्च नीच भेदभाव तर मुळीच नव्हता. सर्व समाज कार्यशिल, कर्तृत्वात आदर्श असा होता.

**जैन धार्मिक उत्सव-** जैन धार्मिक उत्सावाचे एक आगळेच असे वैशिष्ठ आहे की या उत्सवातून व्यक्तीच्या आत्मगुणाचा विकास साधला जातो व धर्मप्रभावना केली जाते. भोगविलासापेक्षा आत्मोन्नतीस प्रधान्य जैन उत्सवामध्ये दिलेले आहे. जैन उत्सव हे स्वतंत्र आहेत. त्यांचे कार्यक्रम फार प्रभावनात्मक आहेत. जैन उत्सवात हिंसा, अनिष्ट रुढी वगैरे कसलेही प्रकार कधीच नसतात. जैन उत्सवातून जीवन विकास दृष्टी आत्मशुध्दी, समाज संघटना, वात्सल्य, प्रभावना अदि उच्च तत्वांचे स्मरण व आचरण हा पवित्र मंगल हेतू साधला जातो. जैन उत्सवात ढोंगीपणा कधीच आढळत नाही तर समाजाला आदर्शची, खऱ्या सन्मार्गाची ओळखच करुन दिली जाते. महावीर जयंती, वीरशासन जयन्ती, श्रुतपंचमी, दशलक्षण पर्व, अष्टान्हिक पर्व, दीपावली, रक्षाबंधन, इ. अनेक प्रकारचे उत्सव आहेत. त्यांचे महत्व, हेतू व स्वतंत्रता याचे समग्रपणे विवेचन केलेले आहे.

तीर्थवंदना- जैनमतानुसार संसारसमुद्रातून पार करण्यासाठी मार्गदर्शन करणाऱ्या महापुरुषांची जन्मापासून निर्वाणापर्यंतची स्थाने यानाच 'तीर्थ' म्हणतात. या दृष्टीने ज्या ठिकाणी तीर्थंकारांची जन्मादिक पांच कल्याणके झाली असतील किंवा पूज्य व्यकती मुनी आदीनी ज्या ठिकाणी निर्वाणप्राप्ती करुन घेतली त्या इकाणास तीर्थक्षेत्र म्हणतात. अशी भारतात अनेक पवित्र तीर्थक्षेत्रे आहेत. सर्वात महत्वाचे सममेद शिखरजी, पुलुआ पहाड, गुणावा, पावापुरी, राजगृही, कुंडलपूर, मंदारगिरी, पाटणा, बनारस, अयोध्या, सोनगढ, अजयगढ, खजुराहो, सिध्दवरकूठ, गिरनार, पावागड, मांगीतुंगी, कुथलगिरी, एलोरा, हुम्मच श्रवणबेळगोळ इत्यादी अनेक पवित्र, मंगल व आत्मोन्नतीसाठी सन्मार्ग प्रेरणा देणारी तीर्थक्षेत्र आहेत. अंतःकरणात पवित्रता, मंगल भावना तीर्थक्षेत्र पहाताच निर्माण होतात. पवित्रतेची आदर्श ठिकाणे म्हणजे जैनतीर्थक्षेत्रच आहेत.

**अर्ध्य १० वा: जैनकला-**

जैनकला आतंरराष्ट्रीय ख्याती प्राप्त झालेली आहे. सर्व कलामध्ये जैन कला सर्वोत्कृष्ट, प्रख्यात असल्याची प्राचीन व आधुनिक इतिहास साक्ष देत आहे. समवायोग सूत्रात ७२ कलांचे वर्णन केलेले आहे. जैनाचार्यानी १८ लिपी कला वर्णिल्या आहेत. जैनकाल मूर्ति-कलेत सर्वश्रेष्ठ असल्याचे साक्षात उदाहरणेच आहेत. जैनमूर्ती भव्य, सुंदर, मोहक, आत्माविष्कार करणाऱ्या पाहिल्याबरोबर कोणत्याही मानवाचे नतमस्तक झाल्याशिवाय राहात नाही. मूर्ति-कलेत श्रवणबेळगोळची जगदविख्यात, भ. बाहुबलीची मूर्ति व अबू पर्वतावरील अजंठा, वेरुळ, महावीरजी येथील दिव्य मूर्ति-कला पहिल्याबरोबर मनुष्य दिङःमूढच होतो. यावरून जैनकला महान व सर्वश्रेष्ठ असल्याची स्पष्टता आढळून येते. चित्रकला, मूर्तिकला, नृत्य, गीत, वाद्य, स्वरगत, पुष्करगत इ. विविध ७२ कलामध्ये जैन सर्वश्रेष्ठ होते. जैन चित्रकलेची विशेष माहिती सदर अर्ध्यातून दिलेली आहे. कलाप्रेमिकानी जैनकलांचा अभ्यास केल्यास त्यांच्या कलागुणांचा निश्चितच विकास होईल. यात कसलीच शंका नाही.

संगीत साधना- जैन संगित कला अति प्राचीन आहे. तीर्थकारांच्या गर्भकल्याणिकाच्या वेळी स्वर्गातील इंद्र भगवंताची संगीतयुक्त स्तुती, पूजा करीत असत. सा, रे, ग, म, प, ध, नि या सात स्वरांचा उल्लेख प्रथमतः या ग्रंथावर श्रीशुभचंद्राचार्यानी टीकेत सांगितले आहे. जैनसंगीतामध्ये संगीतरत्नाकर या इ.स.१२०० च्या ग्रंथामध्यें व संगीतसमयसार यामध्ये देशी रागाचे वर्णन आहे. यामध्ये नाद, गीत, वर्ण, आलाप, राग, रागांग, प्रबोध, अनवद्य, नृत्य, ताळ, प्रस्तार याशिवाय लहानसहान अनेक गोष्टींचे समग्रपणे वर्णन केलेले आहे. पूर्वगत स्वरप्राभृत हा संगीत ग्रंथ असून त्यात २१ मूर्च्छनांचा उल्लेख आहे. भद्रबाहुकृत अल्पसूत्र ग्रंथात वाद्यांचे वर्णन आहे. तालावर महत्वपूर्ण ग्रंथ आहेत. हिंदीत नयनसुखविलास हा महत्वाचा संगीत ग्रंथ आहे. जैन संगीतामध्ये सर्व रागांचा, तालांचा, वाद्यांचा, स्वरांचा सांगोपांग विचार मांडलेला आहे. जगातील संगीतामध्ये जैनसंगीत व नृत्यकला सर्वश्रेष्ठ आहे. साहित्यशास्त्रातील श्लोक, तसेंच आध्यात्मिक ग्रंथ संगीत कलेने परिपूर्ण आहेत. आधुनिक संगीतकारानी जैन संगीतसाहित्याचा अभ्यास केल्यास त्याना संगीताची अपूर्व खाणच सापडणार आहे. जैनसाहित्य फक्त आध्यात्मिक नसून ते संगीतप्रधान, नवरसानी युक्त दिव्य, अलौकिक असेच आहे.

**अर्ध्य ११ वा:**

हा पूर्णार्ध्य ग्रंथाचा हेतू‘ सुखी रहे सब जीव जगतके, कोई कभी न घबरावे / वैर पाप अभिमान छोड जग, नित्य नये मंगल गावे /’ हा आहे.

सत्त्वेषु मैत्री गुणिषु प्रमोदं क्लिष्टेषु जीवेषु कृपापरत्त्वम् /

माध्यस्थभावं विपरीतवृत्तौ, सदा ममात्मा विदधातु देव //

सर्व प्राण्याशी मैत्रीभाव, गुणीजनांच्या समागमनाने आनंद, दुःखाने गांजलेल्या विषयी दयाभाव, विभिन्नता असणाऱ्या बाबत माध्यस्थभाव राहो हा पवित्र हेतू आहे. अगरबत्ती स्वतःसाठी सुगंधित राहूनही जाता जाता जगालाही सुगंधित करते. तद्वतच जैनधर्म निवृत्तिमूलक असला तरी स्वकल्याणाबरोबर विश्वकल्याणही साधतो. समाजस्वास्थ्यास सदाचाराची अत्यंत गरज असते. ‘एकमेका सहाय्य करू, अवघे धरू सुपंथ’ या उदात्त भावना पूर्णार्ध्यातून वर्णन केलेल्या आहेत. या महान ग्रंथातून समता, सहिष्णुता, विश्वबंधुत्व, अहिंसा, सत्य, ब्रम्हचर्य, अपरिग्रह, मानवता इत्यादि धर्मतत्त्वांचे समग्रपणे विवेचन केले आहे. विश्वकल्याणाची, विश्वबंधुत्वाची व समतेची भावना या ग्रंथातून प्रकर्षाने स्पष्ट होते. या पूर्णार्ध्यातील थोर तत्त्वावरूनच विश्वकल्याणाची मंगलभावना स्पष्ट होते.

क्षेमं सर्वप्रजानां प्रभुवतु बलवान् धार्मिको भूमिपालः /

काले काले च समग्विकिरतु मघवा व्याधयो यान्तु नाशम् //

दुर्भिक्षं चौर्यमारि क्षणमपि जगतां मा स्म भुज्जीवलोके /

जैनेंद्र धर्मचक्रं प्रभुवतु सततं सर्वसौख्यप्रदायि //

या अशा अनेक आत्मकल्याणकारी, मंगलमय, पवित्र, शुध्द भावनेतून विश्वकल्याणाचा उच्च हेतू ठेऊनच पूर्णार्ध्य तयार केलेला आहे. यावरुन जैनधर्माची तत्त्वेच विश्वकल्याणकारी व पूर्णत्त्वास प्राप्त करुन देणारी आहेत याची सत्यता पटते. भ. महावीरांनी उदात्त व विश्वकल्याणकारी जैनधर्माचा पुरस्कार केला. जैनधर्म हा फक्त त्यागातच सर्वश्रेष्ठ नसून विश्वकल्याणाच्या तत्त्वातही सर्वश्रेष्ठ आहे. जैन तत्त्वानुसार दुसऱ्याच्या दुःखात सहभागी होऊन सर्वाना सुखी, आनंदी ठेवायला, दुसऱ्यासाठी त्याग कराचला जैन तत्त्वज्ञान सांगते. सर्व जीव समान आहेत, उच्च नीच कोणी नाही. आत्मा हा धर्माचरणाने, आत्मानुभूतीने, क्रमाक्रमाने परमात्मा होतो. हे महान तत्त्व जैनधर्मानेच प्रामुख्याने प्रतिपादिले आहे. जैनधर्मानेच थोर मानवता व अहिंसावादी धर्म प्रथमतः प्रतिपादिला आहे. विश्वकल्याणाचे मूळ जैनतत्त्वेच आहेत. भ. महावीरानी हजारो वर्षापूर्वी अहिंसेचे महान श्रेष्ठत्व, महत्त्व व “जगा आणि जगू द्या” इ. अनेक विश्वकल्याणकारी उच्च तत्त्वे सांगितली व आचरणात आणली. त्यावरून जैनधर्म हाच विश्वकल्याणाचा, आत्मोन्नतीचा खरा मार्ग आहे याची प्रचीती येते.

विश्वसभा (समवशरण) - आपण नेहमी ‘सभा’ पहातो, परंतु भगवंताची सभा ही एक विश्वातील अद्वितीय, सर्वोत्कृष्ट, समतेने, दयेने, मांगल्याने परिपूर्ण असलेली वेगळीच सभा आहे. यास समवशरण हे पवित्र नामाभिधान आहे. या समवशरणात १२ सभा असतात. त्यामध्ये सर्व भव्यजीव राग, द्वेष वैर इ. परभाव सोडून एकत्र बसतात. पशुपक्षीदेखील देव, मानव यांच्या मांडीला मांडी लावून बसतात. गाय आणि सिंह एकत्र जवळ जवळ बसतात. समवशरणात वीतरागता, मांगल्य, समता, बंधुत्व इ. अनेक पवित्र भाव प्रत्येक जीवाच्या ठिकाणी उत्पन्न झालेले असतात.

पूर्ण पवित्र्य, पूर्ण मांगल्यरुप परमवीतरागामुळे समवशरणच नव्हे तर सभोवतालाचा १०० योजनांचा परिसर विद्युत् भारित, आनंदमय, फळाफुलानी भरलेला असतो. १०० योजनांत सर्वत्र मांगल्य, पवित्र्य, निर्भयता, अमाप उत्साह व आनंदाला उधाणच येत असते. समवशरणात देवदर्शनाबरोबर सुंदर, रमणीय, मनोहर, अद्‌भुत, वैभवपूर्ण, चमत्कारिक, भव्य-दिव्य-उदात्त पावन अशा, डोळयांचे पारणे फेडणाऱ्या गोष्टींचे दर्शन होते. स्वर्गीय वैभव जीवंतपणीच पहायला मिळते. आत्मजागृतीचे उत्तम स्थळ म्हणजे समवशरणच होय. म्हणूनच समवसरणास भेट म्हणजे एक अपूर्व सुवर्णसंधि, एक अपूर्व अवसर, एक दुर्मिळ कपिलाषष्ठीचा योग, एक परमभाग्याचा क्षण.अशा त्या दिव्य समवसरणात सर्वोच्च ठिकाणी भगवंत स्थानापन्न झालेले असतात. समवसरणात भगवान जीवाना आत्मकल्याणाचा उपदेश देत असतात. अशी ती एक वेगळीच अवर्णनीय विश्वसभा म्हणजेच भगवंताचे समवसरण आहे. याची रचना स्वर्गातील इंद्र करीत असतात. भगवंताचे समवसरण सर्वांगपरिपूर्ण, आत्मकल्याणास प्रेरणा देणारे वीतरागता, समता निर्माण करणारे असे आहे.

जैनधर्माचा आंतरराष्ट्रीय प्रसार- जैनधर्माची तत्त्वे विश्वकल्याणकारी, उच्च व आदर्श असल्यामुळे साहजिकच जैन धर्माचा प्रसार सर्व जगात होणे क्रमप्राप्त आहे. जैनधर्मच विश्वकल्याणाचा मार्ग सांगणारा एकमेव धर्म आहे. जैनधर्माचा विसाव्या शतकात प्रचार बॅरिस्टर चंपतरायजी जैन यांनी जैन साहित्य इंग्रजीतून लिहून विदेशात केला. श्री कामताप्रसाद बाबूनी अशिया, अमेरिका, युरोप, कॅनडा या महत्वपूर्ण देशात जैनधर्माचे बीजारोपण केले. जर्मनीतील डॉ. कार्लबून यांनी जैनधर्मासाठी आपले सर्व आयुष्य वेचले व शेवटी सल्लेखनेने आपला देहत्याग केला. आस्ट्रेलियातील सुप्रसिध्द विद्वान ए. एल. बाशम यांना जैनधर्म व जैनवस्तुसाराचे विशेष आकार्षण होते. अमेरिकेतील लोकात तर जैनधर्माबद्दल अतिशय उत्सुकता वाढली आहे. वॉशिंग्टन युनिव्हर्सिटीचे प्रो. डोनाल्ड एच. बाशिप यांनी जैनधर्माच्या अहिंसेवर मैलिक विचार मांडले

आहेत. अशी अनेक उदाहरणे आहेत. त्या ठिकाणी जैनधर्माची मौलिक तत्त्वे परदेशातील विद्वानानी आभ्यासली-अनुसरनी आहेत व जैनतत्त्वेच सर्वश्रेष्ठ कल्याणकारी असल्याची त्यांना अनुभूती आलेली आहे. जैनधर्मातील तत्त्वेच विश्वकल्याणकारी असून विश्वबंधुत्त्वाची भावना, समता, शांती प्रदान करणारी आहेत. म्हणून आधुनिक वैज्ञानिक युगात विदेशामध्यें जैनधर्माचा प्रभावीपणे प्रसार चालू आहे. थोर मानवता व खरी आत्मशांति, मनःशांति, मनःशांति, सुखाचा मार्ग, जगा आणि जगू द्या इत्यादि तत्त्वे जगाला फक्त जैनधर्मानेच सांगितनी आहेत. विश्वशांतीचा व विश्वकल्याणाचा महान पुरस्कर्ता व उगमस्थान जैनधर्मच आहे. त्यामुळेच विश्वातील लोकाना जैनधर्माचे महान आकर्षण वाटत आहे. तरी आजच्या जैन युवकांनी ही महान मानवता तत्त्वे व भ. महावीरांचा संदेश विश्वातील कानाकोपऱ्यापर्यंत प्रत्येक जीवापर्यंत पोहचविण्याचे महान कार्य करायला पाहिजे. तरच जगात शांतता, सुख, समृध्दी यांचे साम्राज्य पसरेल.

याप्रमाणे आम्ही हया ११ अर्ध्यांनी परिपूर्ण ज्ञानकोश तयार केलेला आहे. जिगागम समुद्राप्रमाणे अगाध आहे. त्यातूनच आम्ही सर्वांच्या सहाकार्याने सर्व समाजासाठी, मानवासाठी, विश्वासाठी हा अपूर्व ज्ञानकोश तयार केला आहे. जिनागम हे ज्ञानाचे अनन्त स्वरुप आहे. म्हणून आम्ही पूर्णार्ध्याला ज्ञानकोश असे नामाभिधान केले आहे. विविध भाषांतून आलेल्या लेखांचा मराठीत यथामति अनुवाद करुन त्यांचा या ज्ञानकोशात समावेश पूर्णार्ध्याच्या कार्यसिध्दीमध्ये अनेक प्रकारच्या अडचणी येऊन गेल्या. ज्याप्रमाणात लेखन साहित्य उपलब्ध होत गेले त्या प्रमाणात ग्रंथाचा आकार बदलावा लागला. कांही प्रमाणात ग्रंथाचा आकार समतोल राहिला नाही. संकल्पित विविधतेतून आणि अवतरलेल्या विस्कळीतपणातून कांही उणीवा निर्माण झाल्या असतील. या विशाल ज्ञानकोशास कालावधी फारच थोडा मिळालेला आहे.

हा सर्वांगसुंदर व सर्वस्पर्शी ग्रंथ निर्माण करीत असताना मानवी संस्कृतीचा आणि बुध्दिवादाचा समतोल, तसेंच जीवन व विज्ञान याचाही समतोल साधण्यासाठी विविधांगी असलेल्या शोधक, बोधक, विमर्शक, जिज्ञासातृप्ती व जागृती करणाऱ्या लेखांचा संग्रह सुसंगतपणे मांडण्याचा प्रयत्न केला आहे. केवळ पुरातनता व गतानुगतिकता आणि परप्रत्ययबुध्दी टाळून या युगातील जीवनवादाचा परामर्श साधण्यासाठी निरनिराळया जीवनस्पर्शी ग्रंथाच्या एक प्रकारच्या नव्या शैलीला अनुसरून येथे लेखकांची व्यक्तिशः नावे प्रकट केली नाहीत. श्रुताच्या भावात्मक स्वरुपातील एकतानता व ज्ञानमयता अखंड रहावी हा नवा प्रयत्न /

आ.

पंडिता सुमतिबाई शहा.